पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १७९ ■ सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा






## शिवसेना मुख्य नेता एकनाथ शिंदे यांचा अकोला दौरा निश्चित

प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोला:** शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी शिवसेना मुख्य नेता व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बुधवार, ७ जानेवारी रोजी जुने शहरातील आंबेडकर मैदानावर सभा आहे. या सभेत जुने शहरातील शिवसेना उमेदवारांचा प्रचार होणार आहे. शिवसेना उमेदवाराच्या प्रचारासाठीची तयारी सुरु झाली असून त्या दृष्टीने शिवसेना नेत्यांनी रणनिती आखली आहे. बुधवारी होणाऱ्या या सभेकडे सर्वांचे लक्ष असून शिवसेनेत या सभेविषयी उत्साहाचे वातावरण असल्याचे मंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

## अकोल्यासह १६ बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा!

प्रतिनिधी ५ जानेवारी

**मुंबई :** राज्यातील शेतीमालाच्या बाजार व्यवस्थेत मोठाबदल घडवून आणणाऱ्या निर्णयाच्या दिशेने राज्य शासनाने आणखी एक पाऊल टाकले आहे. महाराष्ट्रातील प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा (ई-नाम अंतर्गत) देण्याचा निर्णय यापूर्वीच जाहीर करण्यात आला होता . आता या निर्णयाला गती देत विधी व न्याय विभागाने संबंधित गॅझेट अधिसूचना प्रसिद्ध केली असून , अकोल्यासह राज्यातील १६ बाजार समित्यांची सविस्तर माहिती पणन विभागाकडून मागवण्यात आली आहे . त्यामुळे या समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याबाबतचा अंतिम निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता बळावली आहे.राज्य शासनाने राष्ट्रीय दर्जा देण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी संबंधित बाजार समित्यांकडून शेतीमालाच्या वार्षिक आकडेवारी मागवली आहे.

## ओवेसी यांच्या सभेत राडा ; पोलिसांचा लाठीमार

प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोला:** रात्री सभा आटोपताच ओवेसी यांना पाहण्यासाठी मंचाजवळ प्रचंड उसळलेल्या गर्दीला नियंत्रित करण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. ओवैसी यांचे भाषण संपण्याच्या मार्गावर असताना, त्यांना पाहण्यासाठी मंचासमोर कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळल्याने सभेत गोंधळ झाला. भाषण संपताच कठडे ओलांडून मंचासमोर प्रचंड झालेली गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला.



### सर्व्हेने उडवली खळबळ....

# महानगरपालिका निवडणुकीत ट्विस्ट....

## मराठी मतं ठाकरे बंधूंकडे, अमराठी भाजप-शिंदेंकडे

प्रतिनिधी ५ जानेवारी

**मुंबई :** संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता अधिकृतपणे रंगत चढू लागली आहे. सोमवारपासून मुंबईत ठाकरे बंधू आणि महायुतीच्या प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा सुरू होत असून, राजकीय वातावरण तापू लागले आहे. यंदाची मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेची लढत न राहता, ती थेट राजकीय अस्तित्व आणि वर्चस्वाची चाचपणी ठरणार आहे. एकीकडे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यासाठी ही निवडणूक अस्तित्वाची लढाई मानली जात असताना, दुसरीकडे भाजपने कोणत्याही परिस्थितीत मुंबईत आपलाच महापौर बसवायचा, असा निर्धार केल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

या निवडणुकीत ठाकरे बंधूंनी आपले संपूर्ण लक्ष मुंबईतील मराठी मतदारांवर केंद्रित केले आहे. मराठी अस्मिता, मुंबईवरील हक्क आणि स्थानिक प्रश्न हे त्यांच्या प्रचाराचे मुख्य मुद्दे असणार आहेत. गेल्या काही वर्षांत मुंबईतील लोकसंख्येचा आकृतिबंध बदलला असला, तरी मराठी मतदार अजूनही निर्णायक भूमिका बजावू शकतो, असा ठाकरे बंधूंचा विश्वास आहे. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसे यांची संभाव्य एकत्रित ताकद मराठी मतदारांमध्ये प्रभावी ठरू शकते, असा अंदाज राजकीय विश्लेषक व्यक्त करत आहेत.

दुसरीकडे, भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने या निवडणुकीसाठी वेगळीच आक्रमक रणनीती आखली आहे. मराठी मतदारांसोबतच उत्तर भारतीय आणि इतर अमराठी मतदारांना मोठ्या प्रमाणावर आपल्याकडे खेचण्यावर महायुतीचा भर आहे. मुंबईतील अमराठी व्होटबँक ही भाजपची पारंपरिक ताकद मानली जाते आणि याच ताकदीच्या जोरावर भाजप-शिवसेना महायुती मुंबईत सत्ता कायम ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे प्रचारात हिंदुत्व, राष्ट्रवाद आणि विकासाचे मुद्दे ठळकपणे मांडले जाणार आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर Ascelåia या संस्थेने मुंबई महानगरपालिका निवडणुकीबाबत केलेल्या सर्व्हेने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या सर्व्हेमध्ये मुंबईतील विविध समाजघटकांमध्ये कोणत्या पक्षाला किती टक्के मतदान मिळू शकते, याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या सर्व्हेनुसार, मराठी मतदारांचा मोठा हिस्सा ठाकरे बंधूंच्या बाजूने झुकलेला असला, तरी एकूण राजकीय समीकरण पाहता मुंबईत भाजप-शिवसेनेचाच महापौर बसण्याची शक्यता अधिक असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. Ascelåia च्या सर्व्हेनुसार, मुंबईतील मराठी मतदारांमध्ये ठाकरे गट आणि मनसे यांना ४४ टक्के मतदान मिळण्याचा अंदाज आहे, तर भाजप-शिवसेना महायुतीला ४२ टक्के मराठी मतदारांचा पाठिंबा मिळू शकतो. काँग्रेसला केवळ ४ टक्के तर इतर पक्षांना ११ टक्के मराठी मतं मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यावरून मराठी मतदारांमध्ये लढत अत्यंत चुरशीची असली, तरी ठाकरे बंधूंना मर्यादित आघाडी मिळू शकते, असे चित्र समोर येत आहे.मुस्लीम मतदारांबाबतच्या आकडेवारीतही महत्त्वाचे संकेत मिळतात. सर्व्हेनुसार, मुस्लीम मतदारांपैकी ४१ टक्के काँग्रेसच्या बाजूने मतदान करतील, तर ठाकरे गट-मनसे यांना २८ टक्के मतं मिळू शकतात. भाजप-शिवसेना महायुतीला केवळ ११ टक्के मुस्लीम मतं मिळण्याचा अंदाज आहे, तर उर्वरित २० टक्के मतं इतर पक्षांकडे जाण्याची शक्यता आहे. यामुळे मुस्लीम मतदारांचा कौल हा भाजपच्या विरोधात जाण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. मात्र, या सगळ्या गणिताचा कळीचा मुद्दा म्हणजे अमराठी मतदार. Ascelåia च्या सर्व्हेनुसार, अमराठी मतदारांमध्ये भाजप-शिवसेना महायुतीला ५३ टक्के मतदान मिळू शकते. ठाकरे गट-मनसे यांना केवळ १५ टक्के, तर काँग्रेसला १९ टक्के मतं मिळण्याची शक्यता आहे. उर्वरित १३ टक्के मतं इतर पक्षांकडे जाऊ शकतात. अमराठी मतदारांचा हा मोठा पाठिंबा महायुतीसाठी निर्णायक ठरू शकतो आणि याच जोरावर भाजप-शिवसेनेचा महापौर बसण्याची शक्यता बळावते.

# अकोला शहराला राज्यात 'मॉडेल' शहर बनविणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पाणी, रस्ते, आरोग्य, रोजगार संधी उपलब्ध करून देणार






प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोला :** अकोला शहरात आधुनिक सुविधांसह २४ तास पाणी, सुंदर रस्ते, प्रत्येकांना चांगल्या दर्जाची आरोग्य सुविधा आणि बेरोजगारांना रोजगाराच्या संधी निर्माण करून शहराचा कायापालट करण्यात येईल. हे शहर राज्यात 'मॉडेल' शहर म्हणून नावारूपास येईल. यासाठी एकहाती सत्ता देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

ते भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार) महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ रविवार, ४ जानेवारी रोजी दुपारी अकोला क्रिकेट क्लब मैदानावर आयोजित विजय संकल्प सभेत ते बोलत होते.

या सभेला पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, प्रदेश सरचिटणीस खा. अनुप धोत्रे, आ. रणधीर सावरकर, आ. प्रकाश भारसाकळे, आ. हरिश पिंपळे, आ. वसंत खंडेलवाल, अमोल मिटकरी, माजी मंत्री डॉ. रणजित पाटील, डॉ. दशरथ भांडे, निवडणूक प्रभारी विजय अग्रवाल, विजय देशमुख, संतोष शिवरकर उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांना संत गजानन महाराज यांची प्रतिमा भेट देण्यात आली. त्यानंतर फडणवीस यांच्या हस्ते भाजपच्या 'संकल्पनामा'चे प्रकाशन करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २०१७ मध्ये अकोला महानगरपालिकेत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर हद्दवाढीसाठी २४३ कोटी रुपयांचा आराखडा आ. रणधीर सावरकर यांनी मनपा प्रशासनाला सोबत घेऊन तयार केला व १०० कोटींचा निधी देण्यात आला. मात्र, मध्यंतरीच्या सरकारने १४३ कोटींचा निधी रोखला. आता आपले सरकार सत्तेत असून, हा निधी तातडीने उपलब्ध करून दिला जाईल. अकोल्यासाठी ११३ कोटींची वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर असून, ३६ हजार घरांना नवीन नळजोडणी देण्यात आली आहे. सात नवीन पाण्याच्या टाक्या उभारण्यात आल्या असून, २४ तास शुद्ध पाणीपुरवठा करण्याचा मानस आहे.

### एअर ट्रेनिंग सेंटरची ब्ल्यू प्रिंट तयार!

अकोला विमानतळाच्या भूसंपादनासाठी २०९ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. यासोबतच १ हजार ८०० मीटर लांबीची धावपट्टी करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच ही धावपट्टी २ हजार ८०० मीटर लांबीची करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर अकोला विमानतळावर पायलट ट्रेनिंग सेंटर सुरू केले जात आहे. एअर ट्रेनिंग सेंटरची ब्ल्यू प्रिंट तयार केली जात आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

### लहान मनपांसाठी ३० टक्के देणार!

राज्य सरकारकडून हजारो कोटींच्या विकास योजना मंजूर झाल्यानंतर लहान महानगरपालिकांना आवश्यक असलेला ३० टक्के हिस्सा भरणे आर्थिकदृष्ट्या कठीण ठरते. ही बाब लक्षात घेऊन आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महानगरपालिकांसाठी ३० टक्के हिस्सा राज्य सरकारच भरणार असून, तो निधी ५० वर्षांसाठी बिनव्याजी कर्जस्वरूपात दिला जाणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

## लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा होणार 3000 रुपये!

प्रतिनिधी ५ जानेवारी



**सोलापूर :** मकर संक्रातीपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील महिलांना डिसेंबर व जानेवारी, अशा दोन महिन्यांचे एकूण तीन हजार रुपये मिळणार आहेत. १४ जानेवारीला मकर संक्रात असून १५ जानेवारीला महापालिकांसाठी मतदान आहे. त्यामुळे मकर संक्रातीपूर्वी दोन हप्ते वितरित होतील, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सव्वादोन कोटी लाडक्या बहिणींना चार दिवसांपूर्वी नोव्हेंबरचा हप्ता मिळाला आहे. प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत लाडक्या बहिणींना योजनेचे दीड हजार रुपये मिळतील, असे शासन निर्णयात नमूद आहे. पण, अनेकदा लाभाची रक्कम महिनाअखेर मिळते. पण, आता मकर संक्रांत असल्याने महिला स्वतःसाठी वाण, साड्या खरेदी करतात. या सणाला मोठे महत्त्व आहे. त्यामुळे मागच्या वर्षी देखील लाडक्या बहिणींना दोन महिन्याचे पैसे एकदम देण्यात आले होते.आता निवडणुकीपूर्वी ही योजना सुरू झाल्याने लाभार्थींना लाभ द्यायला कोणताही अडथळा नाही. नगरपालिका निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्याच्या दिवशी ऑक्टोबर महिन्याचा लाभ वितरित झाला होता. आता महापालिका निवडणुकीची आचारसंहिता सुरू झाल्यावर नोव्हेंबर महिन्याचा लाभ देण्यात आला आहे. त्यामुळे १० ते १४ जानेवारी दरम्यान लाडक्या बहिणींना डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचा लाभ एकाचवेळी दिला जाणार आहे. त्यासाठी महिला व बालविकास विभागाने वित्त विभागाकडे निधी मागितल्याचे सूत्रांनी सांगितले.

# महापालिकेत पुन्हा येणार भाजप–राष्ट्रवादीची सत्ता

## भाजप–राष्ट्रवादीची नैसर्गिक युती – विजय देशमुख

प्रतिनिधी ५ जानेवारी



**अकोला:** ज्याप्रमाणे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनी मिळून विजय मिळवला होता, अगदी त्याचप्रमाणे या महानगरपालिका निवडणुकीतही भाजप आणि राष्ट्रवादीची सत्ता पुन्हा महापालिकेत आली पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे महानगर अध्यक्ष विजय देशमुख यांनी हजारो जनसमुदायाला केले. अकोल्यात आयोजित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'विजय संकल्प सभेत विजय देशमुख बोलत होते.

भाजपच्या विजयी संकल्प सभेत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी महानगर अध्यक्ष विजय देशमुख यांची आस्थेने चौकशी केली. त्याच बरोबर त्यांच्याशी अकोल्यातील घडामोडींवर चर्चा केली. अकोला महानगरपालिकेत भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांची नैसर्गिक युती झाली आहे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुका ज्याप्रमाणे दोन्ही पक्षांनी मिळून लढवल्या, त्याचप्रमाणे ही महानगरपालिका निवडणूकही आम्ही एकत्रितपणे लढवत आहोत. जिथे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार निवडणूक लढवत आहेत, तिथे राष्ट्रवादीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते जीव ओतून काम करतील. तर, जिथे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार रिंगणात आहेत, तिथे भाजपचे सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी पूर्ण ताकदीने काम करतील. या समन्वयामुळे निवडणुकीनंतर अकोला महानगरपालिकेत पुन्हा एकदा भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता स्थापन होईल, अशी ग्वाही विजय देशमुख यांनी दिली. अकोला शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसची ही 'महायुती' मतदारांसाठी सर्वात उत्तम पर्याय असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## ५० विद्यार्थ्यांवर मधमाशांचा हल्ला

प्रतिनिधी ५ जानेवारी

**पुणे :** पुण्याच्या राजगड तालुक्यातील मढेघाट परिसरात ट्रेकिंगसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांवर मधमाशांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आग्या मोहोळांच्या मधमाशांनी केलेल्या या हल्ल्यामध्ये ३५ हून अधिक विद्यार्थी जखमी झाले आहेत.

काल ४ जानेवारीच्या संध्याकाळी ही घटना घडली. यातील बहुतांशी विद्यार्थी १४ ते १७ वयोगटातील आहेत. यामध्ये ट्रेकर प्रशिक्षकांचा सुद्धा सहभाग आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार मढेघाट परिसरात पुण्यातील साहसी ट्रेकिंग करणाऱ्या एका क्लासच्या माध्यमातून आयोजित ट्रेकमध्ये सुमारे पन्नासहून अधिक विद्यार्थी घेऊन प्रशिक्षक आणि मार्गदर्शक शिक्षक यांनी मढेघाट ते उपंडा अशा ट्रेकचं आयोजन केलं होतं. मढे घाट उतरल्यानंतर मध्यभागी गेल्यावर गर्द झाडीमध्ये झाडावर असलेल्या आग्या मोहोळाच्या माशा उठल्याने विद्यार्थ्यांवर मधमाशांनी हल्ला केला.

# भारताचे 8 हजार कोटी परत मिळणार?

## आणखी स्वस्तात तेल मिळून पेट्रोल, डिझेल स्वस्त होणार?

वृत्तसंस्था ५ जानेवारी

**नवी दिल्ली :** व्हेनेझुएलामध्ये अमेरिकन सैन्याने केलेल्या कारवाईमुळे राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. व्हेनेझुएलाच्या तेलसाठ्यांवर आता अमेरिकेचे वर्चस्व निर्माण होण्याची शक्यता आहे. या घडामोडींचा सकारात्मक परिणाम भारतावर होणार असून, भारताचे तिथे अडकलेले १ अब्ज डॉलर (सुमारे ८,४०० कोटी रुपये) परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.व्हेनेझुएला हा जगातील सर्वाधिक कच्चे तेल साठा असलेला देश आहे. मात्र, अमेरिकन निर्बंधांमुळे भारताचा तिथून होणारा व्यापार गेल्या काही वर्षांत निम्म्यावर आला होता. भारताची सरकारी क्षेत्रातील कंपनी 'ओएनजीसी विदेश लिमिटेड' व्हेनेझुएलातील तेल प्रकल्पात ४० टक्के भागीदार आहे. मात्र, निर्बंधांमुळे २०१४ पासून भारताचा लाभांश आणि इतर देणी मिळणे बंद झाले होते. ही थकबाकी आता १ अब्ज डॉलरच्या घरात पोहोचली आहे.

### व्यापारावर परिणाम नाही, पण संधी

'ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह'च्या अहवालानुसार, सध्या भारत - व्हेनेझुएला व्यापार खूपच कमी (२.५५ अब्ज डॉलर) आहे. त्यामुळे या राजकीय अस्थिरतेचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही. उलट, भविष्यात अमेरिकेच्या देखरेखीखाली तेल उत्पादन सुरू झाल्यास भारताची उर्जा सुरक्षा अधिक भक्कम होईल.

### भारताला ३ मोठे फायदे

विश्लेषकांच्या मते, व्हेनेझुएलातील तेल क्षेत्राचे पुनर्गठन झाल्यास भारताची थकीत देणी प्राधान्याने दिली जातील. सध्या ओएनजीसी तिथे दिवसाला फक्त ५ ते १० हजार बॅरल तेल काढते. अमेरिकेने निर्बंध शिथिल केल्यास आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे हे उत्पादन १ लाख बॅरलपर्यंत नेणे शक्य आहे. भारतीय कंपन्यांकडे व्हेनेझुएलातील 'जड कच्चे तेल' शुद्ध करण्याची प्रगत यंत्रणा आहे. तिथून स्वस्त तेल मिळाल्यास भारताचा आयात खर्च कमी होईल.

# प्रचाराने सुखावल्या महिला, रोजगारही उपलब्ध!

प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोला:** महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता सुरुवात झाली. बॅनर, पोस्टर, झेंडे, टोप्या, स्कार्फ इत्यादी छापल्यानंतर, उमेदवारांनी शनिवारी त्यांच्या कार्यकर्त्यांसह मतदारांच्या दाराशी जाऊन प्रचाराला सुरुवात केली. तथापि, या निवडणूक लढाईत अनेक उमेदवारांकडे विशेषता अपक्ष उमेदवार आणि छोट्या पक्ष्यांच्या उमेदवारांकडे सकाळी आणि संध्याकाळी प्रचार करण्यासाठी कार्यकर्त्यांची कमतरता आहे. परिणामी, अशा उमेदवारांनी कार्यकर्त्यांना प्रचारासाठी कामावर ठेवण्यास सुरुवात केली आहे, आणि हे प्रचाराचे काम शहरातील अनेक महिलांसाठी उपजीविकेचे साधन बनले आहे. या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, जवळपास सर्वच उमेदवारांनी यापूर्वी प्रभागात त्यांच्या कामाची माहिती देणारी पत्रके प्रकाशित केली आहेत, ज्यात त्यांनी महत्त्वाची कामे प्रभागात केली, कोणत्या क्षेत्रात त्यांनी कोणते विकासकामे केली आहेत आणि निवडणूक जिंकल्यास ते कोणत्या मुद्द्यांना प्राधान्य देतील याची संपूर्ण माहिती दिली आहे. आपापल्या प्रभागातील मतदारांपर्यंत हे काम पोहोचवण्यासाठी, जवळजवळ सर्व उमेदवारांनी त्यांचे वचनपत्रक छापले आहे. महापालिका निवडणुकीत प्रभागातील एक एक मत अत्यंत महत्त्वाचे असते, परंतु मतदारांपर्यंत हे छापील जाहीरनामे पोहोचवण्यासाठी, प्रचारासोबत कार्यकर्त्यांची गर्दी असणे आवश्यक आहे. यासाठी, सकाळी आणि संध्याकाळी त्यांच्या संबंधित प्रभागातील प्रत्येक गल्लीबोळात मोहरल्यांमध्ये प्रचार करण्यासाठी परिसरातील महिलांनाच कामावर ठेवले जात आहे. उमेदवारांनी यासाठी प्रति महिला दररोज ५०० रुपये देण्याचेही मान्य केले आहे. त्याच वेळी, जर पक्षाच्या नेत्याने रॅली काढली तर उमेदवाराला त्यांची ताकद दाखवावी लागते. रॅलीमध्ये समर्थकांच्या गर्दीची उपस्थिती दाखवण्यासाठी, प्रत्येक कार्यकर्त्याला मग तो पुरुष असो वा महिला, ३०० रुपये मजुरी, तसेच नाश्ता आणि सभास्थळी नेणे आणि आणणे यासाठी वाहनांची व्यवस्था केली जात आहे त्यामुळे महापालिकेची ही निवडणूक अनेक बेरोजगार महिलांना रोजंदारी मिळवून देत आहे, त्यामुळे या प्रचाराने महिला कार्यकर्त्या सुखावल्या आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# सहकार व्यवस्थापन पदविकासाठी प्रवेश सुरू

प्रतिनिधी ५ जानेवारी

**अमरावती:** सहकार व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमासाठी अमरावती येथील भाऊसाहेब भोकरे सहकार प्रशिक्षण केंद्रातर्फे दि. १ जानेवारी ते ३१ जुन २०२६ या मुदतीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. दि. १ ते ३० जानेवारी २०२६ या दरम्यान प्रवेश देण्यात येणार आहे. सहकार विभागाने सहकारी संस्थांमध्ये काम कारणाऱ्या कर्मचाऱ्यास सहकारी व्यवस्थापन पदविका अनिवार्य केले आहे. त्यामुळे राज्यातील सहकारी संस्थामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे कामकाज सांभाळून हा अभ्यासक्रम दुरूस्थ शिक्षण पद्धतीने पुर्ण करता यावा, तसेच राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांना सहकार क्षेत्रातील विविध सहकारी संस्थामध्ये सदर पदविका अभ्यासक्रमामुळे नोकरीची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने १३ सहकार प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून हा अभ्यासक्रम पोस्टल पद्धतीने सुरू केला आहे.

# तरुणांनी भावनेपेक्षा विचारांना प्राधान्य द्यावे– जिल्हाधिकारी आशिष येरेकर

◆ भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा ◆ सत्यपाल महाराज, अजय देहाडे, कडूबाई खरात यांनी भरला उपस्थितांमध्ये जोश

प्रतिनिधी ५ जानेवारी

**अमरावती:** तरुणांनी क्षणिक भावना किंवा उत्तेजनाला बळी न पडता शिक्षण, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधावा. विचारांवर आधारित कृतीच समाजाला योग्य दिशा देऊ शकते. समाजाच्या सकारात्मक परिवर्तनात तरुणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून त्यांनी भावनेच्या भरात न वाहता विचारपूर्वक वाटचाल करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले. सायन्सकोर मैदानावर आयोजित भीमा कोरेगाव शौर्यदिन मानवंदना कार्यक्रमात ते कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.



पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान हे विवेक, समता आणि न्यायावर आधारित आहे. त्या विचारांचा अंगीकार केल्यास समाजात शांतता आणि प्रगती नक्की साधता येईल.'

भीमा कोरेगाव शौर्यदिनाच्या निमित्ताने आयोजित हा कार्यक्रम तरुणांमध्ये वैचारिक जागृती निर्माण करणारा ठरला, असेही जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नमूद केले. भीमा कोरेगाव विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून सिद्धनाक महार याचे बारावे वंशज मिलिंद इनामदार हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मिरज येथील समशेर नदाब, पूनम गायकवाड, सतीश नाईक, शफी भाई, गौतम बनसोड, कृष्णराव वानखडे, बी.आर. धाकडे, अनिल हिरेकन, बी.एम. वानखडे, सुदेश वासनकर, धर्माजी वंजारी, अरुण आठवले, डॉ. लोंधे, राजू झोडापे, बन्सी भटकर, कपिल धवणे आदी मान्यवर मंडळी धम्मपिठावर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या मनोगतानंतर सामाजिक चळवळीत योगदान देणाऱ्या तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई, सामाजिक कार्यकर्त्या रजिया सुलताना, तपोवन चे अध्यक्ष डॉ.सुभाष गवई, अनाथांच्या आई कुमुदिनी इंगळे, विरपिता धनंजय गुळदेकर, लंडन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घर खरेदी करतांना महत्वाची भूमिका बजावणारे रमेश कटके, गोरगरिबांचा निशुल्क इलाज करणाऱ्या डॉ.पुष्पा थोरात, योगगुरू राजू डांगे, सामाजिक चळवळीत योगदान देणारे अनिल बागडे व मंदाकिनी बागडे, माजी जिल्हा क्रीडा अधिकारी अशोकराव खंडारे यांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते समाजभूषण पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

विशेष अतिथी म्हणून लाभलेले मिलिंद इनामदार आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, भीमा कोरेगावचा शौर्यदिन हा केवळ इतिहासाची आठवण करून देणारा नाही, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद देणारा आहे. आपण कोणत्याच क्षेत्रात कमी नाही, कमी असल्याची भावना मनात ठेवणे हेच पराभवाचे कारण ठरते. आत्मविश्वास, शिक्षण आणि संघटित प्रयत्नांच्या बळावर आपण कोणतीही उंची गाठू शकतो.

# तणावातून शिक्षक बँक कर्मचाऱ्याची आत्महत्या

◆ नांदगाव पेठ परिसरात खळबळ ◆ रहाटगाव येथे झाडाला गळफास घेऊन संपविली जीवनयात्रा

प्रतिनिधी ५ जानेवारी

**नांदगाव पेठ:** नांदगाव पेठ येथील रहिवासी व सध्या रहाटगाव येथे वास्तव्यास असलेले शशिकांत विनायकराव महल्ले (४६) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी दुपारी उघडकीस आली असून या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. शशिकांत महल्ले हे अमरावती येथील शिक्षक बँकेत कार्यरत होते. मात्र नोकरीदरम्यान मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या आरोपाखाली त्यांना निलंबित करण्यात आले होते. याप्रकरणी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हेही दाखल



होते. या सर्व प्रकरणांमुळे ते गेल्या काही महिन्यांपासून मानसिक तणावात असल्याची माहिती समोर येत आहे.

गुरुवारी ते अचानक घरातून बाहेर पडले होते. त्यानंतर कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला; मात्र त्यांचा काहीही थांगपत्ता लागला नाही. दरम्यान, शुक्रवारी दुपारी रहाटगाव येथील वृंदावन सदनिका परिसरामागील, आरोग्य कॉलनीतील त्यांच्या निवासस्थानापासून अगदी जवळच असलेल्या एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळून आला. ही बाब समजताच कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला.

घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून या घटनेचा सखोल तपास नांदगाव पेठ पोलीस करीत आहेत.

# सुधीर केने यांना पुणे येथील शिवप्रतिष्ठानचा राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी ५ जानेवारी

**चांदुर रेल्वे:** शिव प्रतिष्ठान, पुणे यांच्या वतीने तालुक्यातील मालखेड रेल्वे येथील वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विद्यालयात कार्यरत असणारे शिक्षक सुधीर पंजाबराव केने यांची राज्यस्तरीय महाराष्ट्र आदर्श शिक्षक रत्न पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे.

समाजसेवा, सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य तसेच सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात



आला आहे.

शिव प्रतिष्ठानने पाठविलेल्या पत्राद्वारे केने सरांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या प्रेरणादायी कार्यामुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या प्रयत्नांतून अनेकांना नवी दिशा व उमेद मिळाल्याचेही पत्रात स्पष्ट केले आहे.

या पुरस्काराचा वितरण सोहळा २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता, समर्थ मंगल कार्यालय पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या समारंभात मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सुधीर केने हे माहिती अधिकार कायद्याचे राज्य प्रशिक्षक असून त्यांचे चार पुस्तकही प्रकाशित झाले आहेत. दूरदर्शन व आकाशवाणीवरही त्यांचे कार्यक्रम झाले आहेत.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायतचा विकासात्मक आदर्श

प्रतिनिधी ५ जानेवारी

◆ नववर्षाच्या पहिल्याच दिवशी विकास, सुशासन आणि समाजप्रबोधनाचा त्रिवेणी संगम

**नांदगाव पेठ :** नववर्षाच्या प्रारंभीच गावाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प कृतीत उतरवत नांदगाव पेठ ग्रामपंचायतने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत लोकाभिमुख, नावीन्यपूर्ण व प्रशासकीयदृष्ट्या आदर्श ठरणाऱ्या विविध उपक्रमांचे प्रभावी आयोजन करून ग्रामविकासाची नवी दिशा दाखवून दिली आहे.

ग्रामपंचायत नांदगाव पेठच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमांचे उद्घाटन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बाळासाहेब बायस यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच कविताताई विनोद डांगे होत्या.

यावेळी पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, गटविकास अधिकारी सुदर्शन तुपे, ग्रामपंचायत



अधिकारी हर्षदा बोंडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे ग्रामपंचायतच्या उपक्रमांना प्रशासकीय पाठबळ लाभले. या कार्यक्रमाअंतर्गत ग्रामपंचायत परिसरात 'सुशासन युक्त गाव' संकल्पनेतून पोलीस चौकीचे उद्घाटन, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उमेद बचत गट कार्यालयाची स्थापना, आयुष्यमान भारत गोल्डन कार्ड वाटप शिबिर, सुशिक्षित युवकांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण, महिलांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, दिव्यांग नागरिकांना ओळखपत्र वाटप, तसेच घरकर भरण्यासाठी क्यूआर कोड प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला.

याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज चौकात डिजिटल स्क्रीनद्वारे स्वच्छतेचा संदेश देणारा उपक्रम सुरू करून ग्रामपंचायतने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत सुशासनाचा प्रत्यय दिला. सायंकाळी विशेष जनजागृती कार्यक्रमांतर्गत संत काशिनाथ धाम येथे ह.भ.प. संतोष महाराज भालेराव (वाशिम) यांच्या समाजप्रबोधनपर भारूड कार्यक्रमाने नागरिकांना सामाजिक जाणीव व संस्कारांचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमाला ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी ग्रामपंचायत नांदगाव पेठने राबविलेले हे उपक्रम केवळ उद्घाटनापुरते मर्यादित न राहता गावाच्या सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय विकासासाठी दूरदृष्टीने उचललेले ठोस पाऊल असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधान, विश्वास व नवउत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मी स्वतःला नेता मानत नाही तर मी नेता बनवण्यासाठी आलो

प्रतिनिधी ५ जानेवारी

◆ एमआयएम चे नेते तथा खासदार असदुद्दीन ओवैसी यांची सभेत स्पष्टोक्ती

**अमरावती :** गेल्या ७० वर्षात एकाही राजकीय पक्षाने मुस्लिमांची प्रगती केली नाही आणि अल्पसंख्याकांचा नेता तयार होऊ दिला नाही. त्यामुळे मी स्वतःला नेता मानत नाही, मी येथे नेता बनवायला आलो आहे, अशी स्पष्टोक्ती एमआयएमचे सर्वेसर्वा खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी रविवारी येथे दिली.

ॲकेडमिक अमरावती वलगाव मार्गालगतच्या स्कूलच्या प्रांगणात एमआयएम उमेदवारांच्या प्रचारात आयोजित जाहीर सभेत बोलत होते. पुढे खासदार ओवैसी म्हणाले, गत ७० वर्षात अल्पसंख्याक समाजाचा कोणीही नेता बनला नाही. मात्र, निवडणुकीच्या माध्यमातून मुस्लीम समाजात नेता तयार करण्याचे प्रयत्न करीत आहे. अमरावती महापालिका निवडणुकीद्वारे नेता तयार होतात, ते पुढे समाजाचा आवाज बुलंद करतील. अन्याय, अत्याचाराविरुद्ध लढा लढा



**मुलं जन्माला घालण्यापासून तुम्हाला कोणी रोखले ?**

गत काही दिवसांपूर्वी भाजप नेत्या नवनीत राणा यांनी हिंदूनी किमान चार मुलं जन्माला घालावी, असे आवाहन केले होते. कारण पाकिस्तानात एका मौलवीला १९ मुलं असल्याच्या पार्श्वभूमीवर हिंदूची संख्या वाढावी, या उद्देशाने नवनीत राणा बोलल्या होत्या. मात्र खासदार असुदुद्दीन औवेसी यांनी रविवारी राणा यांचा नामोल्लेख टाळत मुलं जन्माला घालण्यापासून कोणी कोणाला रोखले नाही, असा त्यांनी टोला लगावला. मी सहा मुलावरचं थकलो असून त्या मौलवीची भेट घेतली पाहिजे अशी कोपरखळी त्यांनी काढली.

उभारून मुस्लीम समाजाला न्याय प्रदान करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. केंद्रातील भाजप सरकार हे मुस्लिमांवर अन्याय, अत्याचार करीत असल्याचा आरोप खासदार औवेसी यांनी केला. जनतेला मूलभूत सुविधा मिळत नाहीत. लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळत नाही. भूमिगत लाईन नाहीत, शाळा गरीब लोकांच्या उपचारासाठी चांगले रुग्णालय नाहीत. शिक्षणासाठी चांगले नाहीत. सरकारकडून विकासासाठी निधी येतो पण त्याचा योग्य उपयोग होत नाही. राजकीय पक्ष आघाडी करत आहेत, पण जनतेला ते फसवत आहेत. जनतेचा उपहास केला जात आहे. जे शब्द दिले जातात ते पूर्ण होत नाहीत, असेही ते म्हणाले. यावेळी एमआयएमचे शहर अध्यक्ष हाजी इरफान खान, युसूफ पूजांजी, अब्दुल हमीद आदी उपस्थित होते.

## रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाने शेकडो कामगारांना ग्रॅज्युइटी पासून ठेवले वंचित

# भाजप नेते विवेक गुल्हाने यांच्या नेतृत्वात आजपासून कामगारांचे उपोषण

प्रतिनिधी ५ जानेवारी

◆ प्रशासनाला निवेदने देऊनही दखल नाही

**अमरावती :** पंचतारांकित एमआयडीसी परिसरातील रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पात काम करणाऱ्या शेकडो कामगारांना कायदेशीर हक्काची ग्रॅज्युइटी (उपदान) न दिल्याने कामगारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. कामगारांनी वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे आजपासून कामगार भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांच्या नेतृत्वात उपोषणाला बसणार आहेत. या उपोषणाच्या माध्यमातून कामगारांची आर या पार ची लढाई सुरू होणार आहे. कामगार, प्रकल्पग्रस्त आणि शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेल्या रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाकडून वारंवार होणाऱ्या अन्यायाविरोधात आता कामगार एकवटले असून रतन इंडिया व्यवस्थापनासह प्रशासनाचे धाबे दणाणले आहे.



रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाची सह कंपनी असलेल्या दिल्ली मॅनेजमेंट फॅसिलिटी ( डीएमएफ) या कंपनीतील कामगारांनी दि. १३ नोव्हेंबर २०१७ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत सलग ७ वर्षे ६ महिने सेवा पूर्ण केली असून, ग्रॅज्युइटी कायद्यानुसार त्यांना उपदान मिळणे बंधनकारक आहे. मात्र डीएमएफ कंपनीचे कामकाज ३० एप्रिल २०२५ रोजी संपुष्टात येऊनही आज त्याला ७-८ महिने उलटून गेले तरी एकाही कामगाराला ग्रॅज्युइटी मिळालेली नाही, असा गंभीर आरोप कामगारांच्या वतीने करण्यात आला आहे.

इतकेच नव्हे तर मार्च २०२१ च्या वेतनातून कामगारांचे प्रत्येकी १२०० ते १३०० रुपये कपात केलेली रक्कमही आजतागायत परत करण्यात आलेली नाही, ही बाब कामगारांवर अन्याय करणारी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कामगारांनी ग्रॅज्युइटीसाठी वारंवार पाठपुरावा करूनही कंपनी व्यवस्थापनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात येत आहे. कामगारांनी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांना याबाबत माहिती दिली असता विवेक गुल्हाने यांनी इंडिया ऊर्जा प्रकल्प व्यवस्थापन, जिल्हा प्रशासन, कामगार आयुक्त यांना लेखी निवेदन देऊन ४ जानेवारी २०२६ पर्यंत कामगारांचा प्रश्न सोडविण्याची व त्यांना न्याय देण्याची मागणी केली होती अन्यथा ५ जानेवारीपासून रतन इंडिया कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सर्व कामगारांसह बेमुदत उपोषण व ठिय्या आंदोलन छेडले जाईल, असा ठाम इशारा देण्यात आला होता. दरम्यान प्रशासनाने तसेच रतन इंडिया व्यवस्थापनाने कामगारांच्या निवेदनाच्या केराची टोपली दाखवत कामगारांना ठेंगा दाखविण्याचा प्रयत्न केला त्यामुळे कामगारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. रतन इंडियासमोर लाचार झालेल्या कामगार आयुक्तांनाही कामगारांचे हक्क, कष्ट आणि वेदनांचा विसर पडला असून आजवर असंख्य निवेदने देऊनही कामगारांच्या कोणत्याही समस्यावर कामगार कार्यालयाने तोडगा न काढता मालकांच्या बाजूने न्याय देण्यात धन्यता मानत आहे त्यामुळे संतप्त कामगार आजपासून न्याय मिळेपर्यंत उपोषणाला बसणार आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# मांडका शिवारात हातभट्टी दारू अड्ड्यावर कारवाई

◆ ७६ लीटर दारू, २९० लीटर मोहसडवा जप्त

प्रतिनिधी ५ जानेवारी

**खामगाव :** पिंपळगाराजा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मांडका शिवारात गावठी हातभट्टीची दारू तयार करून तिची विक्री केली जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धडक कारवाई केली. मांडका येथे धाड टाकून आरोपी महादेव नरसिंग सोळंके (४५, रा. मांडका) याच्या ताब्यातून दारू तयार करण्याचे साहित्य, ७६ लीटर गावठी हातभट्टी दारू आणि २९० लीटर मोहसडवा असा सुमारे ३७ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ३७हजार ३०० रुपर्याचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार भागवत मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक किशोर बर्वे यांच्यासह अनिल इंगळे, सतीश सरोदे, गोपाल सोनोने, शिवप्रसाद खुरपे आणि दत्ता बोंद्रे यांनी केली.

# 'खामगाव रत्न' पुरस्कार संजय खंडेराव तर 'खामगाव गौरव' हनुमान व्यायाम मंडळाला जाहीर

प्रतिनिधी ५ जानेवारी

**खामगाव :** खामगाव प्रेस क्लबच्या वतीने दिल्या जाणारा 'खामगाव रत्न' पुरस्कार संजय खंडेराव तर 'खामगाव गौरव' हा पुरस्कार हनुमान व्यायाम मंडळाला जाहीर करण्यात आला आहे. ६ जानेवारीला पत्रकार दिनी या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

यावर्षी 'खामगाव रत्न' पुरस्कारासाठी सर्पमित्र तसेच नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनात व दुर्देवी दुर्घटनेत मदतीसाठी तत्पर संजय खंडेराव यांचे नाव निश्चित केले आहे. तर क्रीडा व सामाजिक क्षेत्रात अग्रेसर, मोठ्या प्रमाणात क्रीडा पटूंना घडवित देशसेवेची प्रेरणा हनुमान व्यायाम मंडळ, सती फैल ला यंदाचा 'खामगाव गौरव' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



पत्रकार भवनात ६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अप्पर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा, माजी आमदार दिलीपकुमार सानंदा, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वरदादा पाटील, वंचित बहुजन आघाडीचे नेते अशोक सोनोने, उपविभागीय अधिकारी डॉ.रामेश्वर पुरी, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.प्रदिप पाटील, तहसीलदार सुनिल पाटील आदींची प्रमुख उपस्थिती राहील. यावेळी नगर पालिका निवडणुकीत विजयी झालेल्या पत्रकारांचा तसेच विदर्भ विभागातून पत्रकारिता क्षेत्रात प्रथम पीएचडी पदवी प्राप्त करणाऱ्या डॉ. राजेश राजोरे यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

# महिलेवर अत्याचार; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी ५ जानेवारी

**खामगाव :** जळगाव जामोद तालुक्यातील एका गावातील महिलेवर अत्याचार केल्याप्रकरणी ४ जानेवारी रोजी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी पीडिता राहत्या घरी असताना आरोपी मद्यधुंद अवस्थेत तेथे आला. घराच्या दरवाजाला लाथ मारून आत प्रवेश करून त्याने महिलेस धमकावले व तिच्यावर अत्याचार केला.

पीडितेने विरोध केल्यानंतर तिला जिवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. पीडितेच्या तोंडी तक्रारीवरून तसेच वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोलिसांनी आरोपी समीर अकबरखा तळवी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक खाडे करीत आहेत.

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## भिमा कोरेगाव शौर्य दिनी ५०० शूरवीरांना सलामी



प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोट:** आकोलखेड येथील तरुणांनी भिमा कोरेगाव येथे जाऊन ५०० शूरवीरांना सलामी दिली. १ जानेवारी १८१८ येथे झालेल्या लढाईत २८ हजार पेशव्यांचा ५०० शूरवीरांनी नायनाट केला. त्या दिवशी विजयस्तंभाला सलामी देण्याची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. म्हणून तेव्हापासून लाखोंच्या संख्येने सैनिक भिमा कोरेगाव येथील विजय स्तंभाला सलामी देण्यासाठी जात असतात.यावेळी आकोलखेड येथील गौरव नगराळे, राजकुमार तायडे, सुमित नगराळे, भारत सिरसाट, संघर्ष मुनेश्वर, अनुप सिरसाट, शंतनू घनबहादूर, सोहम वासेकर आदींनी सलामी दिली.

## आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत महाराष्ट्र खेळाडूंनी मारली बाजी



प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोला:** २८,२९ डिसेंबर २०२५ रोजी दिल्ली येथे १३ वी आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धा चे आयोजन शितो रियु कराटे स्कुल ऑफ इडिया .जापन कराटे ने केले होते. या स्पर्धेत भारत, जापान, नेपाल उसबैगीस्तान,ईरान या देशाचे खेळाडूनी सहभाग नोदविले होते या मध्ये इडिया टीम मध्ये या अकोलाचे कराटे खेळाडू सहभाग घेऊन स्पर्धे मध्ये विजयी खेळाडू कुमिते खेळ प्रकार गोल्ड मेडल स्वांनदी ब्राम्हणकर-,श्रीया बोडखे, सिल्वर मेडल साक्षी ब्राम्हणे, ओम सरदार (ब्राँझ मेडल ) संजना सातरोटे आहेत.

# पोलिस उदय दिनानिमित्त ग्रामीण पोलिसांकडून रक्तदान शिबिर व सायबर जनजागृती

वि. प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोट:** पोलिस उदय दिनानिमित्त ग्रामीण पोलिस स्टेशनतर्फे २ व ३ जानेवारी रोजी विविध सामाजिक व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत रक्तदान शिबीर, विद्यार्थ्यांसाठी पोलीस स्टेशन भेट तसेच सायबर गुन्हे व व्यसनमुक्तीविषयी पथनाट्याचे आयोजन करण्यात आले.

२ रोजी पोलिस स्टेशन अकोट ग्रामीणला सेंट पॉल स्कूल तसेच पणज येथील हुसेन दलवाई उर्दू विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट दिली. पोलिस निरीक्षक किशोर जुनघरे, उपनिरीक्षक मिनाक्षी काटोले व पोलीस स्टाफ यांनी विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनमधील कायम विभाग, गुप्तचर



विभाग, मुद्देमाल कक्ष, शस्त्रसाठा तसेच पोलीस कामकाजाची सविस्तर माहिती दिली.

याच दिवशी आयोजित रक्तदान शिबिरात एकूण ३२ दात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

३ रोजी ग्राम उमरा येथील लोकमान्य टिळक विद्यालयात सायबर गुन्हे व व्यसनापासून होणारे दुष्परिणाम याविषयी प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यासाठी रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान 'मिशन उडान', सायबर गुन्हे प्रतिबंध व अंमली पदार्थ विरोधी संदेश देणाऱ्या पोस्टरद्वारे नागरिकांमध्ये जागृती करण्यात आली.

हे सर्व उपक्रम पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशान्वये, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत बी. रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. या उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीत पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, पोउपनि मिनाक्षी काटोले यांच्यासह पो.हे.कॉ. उमेशचंद्र सोळंके, मोहम्मद नौरंगाबादी, योगेश जउळकार, शिवकुमार तोमर, मपोहेकॉ गीता भांगे, उमा आसरे, पोकॉ सचिन कुलट, नंदकिशोर नेमाडे व राजेश माळेकर यांनी योगदान दिले.

## सावित्रीबाई फुले जयंती निमित्त रक्तदान शिबिर



प्रतिनिधी ५ जानेवारी

**हिवरखेड:** गिऱ्हे नगरातील संत सावता माळी प्लॉट मधील संत गाडगेबाबा मैदानात रक्तदान शिबिर पार पडले. या शिबिरात अनेक तरुणांनी रक्तदान केले. हे शिबिर श्री सावित्रीबाई फुलें यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आले.

यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून महामानवांना अभिवादन करण्यात आले. या शिबिरासाठी संतोष राखोंडे मित्र परिवारासह आयोजन समितीच्या वतीने शिबिराचे नियोजन करण्यात आले होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोलाच्या चमुने तसेच संदीप मसुरकार, स्वप्नील वानखडे, अतुल ओंकारे, जयकिशन मानकर, विनोद भोपळे, प्रफुल्ल बीजेकार, आकाश मानकर, विलास उगले, आनंद देऊळकार, सचिन दाते, सतिष काळपांडे, सुभाष ओंकारे, वैभव व्यवहारे, रविंद्र येणकर, यांच्यासह अनेक फुले शाहू सैनिकांनी परिश्रम घेतले. शिबिराला नगराध्यक्षा सुलभाताई दुतोंडे , ठाणेदार गजानन राठोड यांनी भेट दिली.

## निधन वार्ता

### अनुसयाबाई काळे



**अकोट:** मुंडगाव येथील सौ. अनुसया गणेश काळे (५८)यांचे १ जानेवारीला निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी व एक मुलगा सह मोठा आप्त परिवार आहे.

### प्रतिभाताई देशमुख



**अमरावती :** माजी पालकमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ सुनिल देशमुख यांची आई श्रीमती प्रतीभाताई देशमुख (८८) यांचे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुलगे प्रताप, सुनील आणि अनिल, एक विवाहित कन्या सौ. राणी , सुना, जावई नातवंडे व बराच मोठा आप्त परिवार आहे.

### माणिकराव गावंडे



**अमरावती :** माजी पालकमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ सुनिजावई नातवंडे व बराच मोठा आप्त परिवार आहे.

## सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये 'एस.पी.ए. ऑलिम्पिक' क्रीडा सप्ताह उत्साहात




वि. प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोट :** श्रीजी कॉलनी येथील सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये एस.पी.ए. ऑलिम्पिक या क्रीडा सप्ताहाचे आयोजन २९ डिसेंबर २०२५ ते ३ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले. खो-खो, कबड्डी, लंगडी, सॅक रेस, रोप स्किपिंग, क्रिकेट, रिले, लगोरी, व्हॉलीबॉल, स्लो सायकलिंग आदी मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले. क्रीडा सप्ताहाच्या विविध दिवसांना शहर व ग्रामीण भागातील पोलीस निरीक्षक, शिक्षणाधिकारी, शाळा व्यवस्थापन पदाधिकारी, पालक प्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते. चौथ्या दिवशी कार्यक्रमाचे उद्घाटन आकोटचे बी.ई.ओ. मधुकर सूर्यवंशी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी दिपम लखोटिया होते. क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, असे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमात स्वागतगीत, क्रीडाविषयक नृत्य तसेच बक्षीस वितरण करण्यात आले. सप्ताह यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक विजय बिहाडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## प्रभाग १२ मध्ये भाजप-राष्ट्रवादीचे अजय शर्मा यांची बाजू भक्कम

प्रतिनिधी ५ जानेवारी



**अकोला:** महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराने आता चांगलाच वेग घेतला आहे. प्रभाग क्रमांक १२ मध्ये जनभावना स्पष्टपणे दिसू लागली आहे. प्रभागाच्या नेतृत्वाबाबत सुरू असलेल्या चर्चेत स्थानिक प्रश्नांची जाण असणारे आणि जनतेत सतत उपलब्ध राहून विकासाला प्राधान्य देणारे व्यक्तिमत्व म्हणून भाजपचे अजय शर्मा यांचे नाव आघाडीवर आहे. प्रभागातील विविध भागांत भाजपच्या कमळ चिन्हास मतदारांचा मोठा पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

प्रभाग १२ मधील नागरिकांच्या मते, भारतीय जनता पक्षाचे तरुण आणि आक्रमक उमेदवार अजय शर्मा यांची ओळख केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसून, ते वर्षभर जनतेच्या सुख-दुखात सहभागी होणारे कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. प्रभागाची सामाजिक स्थिती आणि जमिनीवरील समस्यांची त्यांना सखोल जाण आहे. सामाजिक कार्यक्रम असो वा स्थानिक प्रश्न, शर्मा यांचा सहभाग आणि समस्या सोडवण्याची तत्परता यामुळे मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झाला आहे. या निवडणुकीकडे प्रभाग १२ चा मतदार केवळ एक औपचारिकता म्हणून न पाहता, प्रभागाच्या भविष्याकडे पाहत आहे. रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, नागरी सुविधा आणि सुरक्षितता यांसारखी कामे त्यांच्या कार्यकाळात मार्गी लागली आहेत. अजय शर्मा यांच्या नामांकन प्रक्रियेपासून ते प्रचारापर्यंत उसळलेली गर्दी पाहता, त्यांचा विजय आता निश्चित मानला जात आहे. आज दुपारी शहरात मुख्यमंत्र्यांच्या विजय संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पॅनेलचे सर्व उमेदवार आपल्या समर्थकांसह सभास्थळी पोहोचले. या भव्य रॅलीने विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. या रॅलीत भाजपचे अजय शर्मा, डॉ. प्रा. अनुप शर्मा, भाजप महानगर उपाध्यक्ष संतोष पांडे, मनीष बाछुका, खोलेश्वर मंडळाचे अध्यक्ष नितेश पाली, कालीचरण अवस्थी, संदीप ठाकूर, सुरेंद्र चौहान, मनोज साहू, निशा कढी, रवीता शर्मा, प्रकाश अग्रवाल, गणेश सपकाळ, सुगत गवई, सोनू उपरीकर, सतीश शुक्ला, निलेश तायडे, महेश गोंधळेकर, मंगेश बांगर, राधाताई सांगेवार यांच्यासह खोलेश्वर रोड मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सैयद मोहसीन उर्दु हायस्कुल शिवणी येथे मतदार जनजागृती अंतर्गत विविध स्पर्धा



प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोला:** महानगर पालीका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ च्या अनुशंगाने यंग मुसलीम एज्युकेशन अँड सोशल वेलफेअर सोसायटी पातुर व्दारा संचालीत सैयद मोहसीन ऊर्दु हायस्कुल शिवनी येथे मतदानाची टक्के वाढविण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक सैय्यद मोहीब ईकबाल सर यानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले मतदान जागृती साठी विद्यार्थ्यांने वकतृत्व सपर्धा चित्र कला सपर्धा घेण्यात आली विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीपर विविध आकर्षित चित्र काढले असुन वोट का दान लोकतंत्र की पहचान देश का महात्योहार मतदान करा लोकशाही बळकट करा मतदान आपका अधिकार है मतदान जागृतीपर विध्यार्थ्यां व्दारे चित्रकला सपर्धेच्या माध्यमातून फलक तयार करण्यात आले व तसेच स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सम्मानीत करण्यात आले शाळेतील सहायक शिक्षक असीमोद्दीन सर यानी मतदानाचे महोत्व पटवुन सागीतले या कार्यक्रमाला यशस्वीते साठी शाळेतील सहायक शिक्षक शमशेर खान मोहम्मद अनवारोदीन मोहममद जाहिद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले.

## सावित्रीबाई फुले जयंती उत्सवात ज्ञानज्योती दिनदर्शिकेचे प्रकाशन, गुणवंत सत्कार

प्रतिनिधी ५ जानेवारी



**अकोट:** अकोट तालुक्यामधील आकोलखेड येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने विशेष ज्ञानज्योती दिनदर्शिकाचे प्रकाशन सोहळा व गुणवंत विद्यार्थ्यांचा आई-वडिलांसह सत्कार करण्यात आला. यावेळी जयंती उत्सव कार्यक्रमाचे अध्यक्ष अमोल निमकर तर ज्ञानज्योती दिनदर्शिका प्रकाशन सोहळा उद्घाटक किशोर जुनगरे पोलीस निरीक्षक ग्रामीण पो.स्टेशन अकोट , मिलिंद झाडे शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष, मीनाक्षीताई काटोले उपनिरीक्षक ग्रामीण पो. स्टेशन अकोट, यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाला विशेष उपस्थिती गजानन डाफे संचालक, पवन बेलसरे पत्रकार, रितेश भोरखडे उपसरपंच ,सौ पल्लवी गणगणे सावित्री ग्रुप अध्यक्ष, शुभांगी गणोरकार, वैशाली फुलारी ,उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे कुमकुम तिलक करून फुलांच्या उधळण मध्ये स्वागत करत व्यासपीठावर विराजमान करण्यात आले सर्व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या फोटो प्रतिमेचे पूजन करून फुल पुष्प हार वाहनात आले यावेळी एकमुखी 'जय ज्योती... जय क्रांती'चा जयघोष करण्यात आला. व्यासपीठावर विराजमान पाहुण्यांचे शिवदास मुऱ्हेकार, अशोक गणोरकर, मनोज पवार, विठ्ठल टवलारे, नंदूभाऊ फुलारी, मयूर लहाने व महिला प्राजक्ता गणोरकार, शितल जांभे, शारदा गणोरकार, प्रतिक्षा बोरोडे यांनी महिलांचे शाल पुष्प देऊन स्वागत केले.

## 'एमएसीसीआयए'च्या गव्हर्निंग कौन्सिलवर अकोल्याचे सिद्धार्थ रुहाटिया निमंत्रित सदस्य

प्रतिनिधी ५ जानेवारी



**अकोला:** व्यापार, उद्योग आणि शेती क्षेत्रातील अग्रणी मानल्या जाणाऱ्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर' ('एमएसीसीआयए') या राज्यातील शिखर संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलवर अकोल्याचे उद्योजक सिद्धार्थ रुहाटिया यांची 'निमंत्रित सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

'एमएसीसीआयए' ही संस्था सन २०२७ मध्ये शतकोत्तर वर्षपूर्ती साजरी करणार असून त्या पार्श्वभूमीवर उद्योग–व्यापार विकासास गती देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन सुरू आहे. अशा महत्त्वाच्या टप्प्यावर रुहाटिया यांची निवड झाल्याने अकोला जिल्ह्यासह पश्चिम विदर्भातील व्यापार–औद्योगिक क्षेत्राचा सन्मान झाल्याची भावना व्यक्त होत आहे. 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर' चे अध्यक्ष रविंद्र माणगावे यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात आलेल्या अधिकृत पत्राद्वारे या निवडीची माहिती देण्यात आली. गव्हर्निंग कौन्सिलमध्ये निमंत्रित सदस्य म्हणून काम करत उद्योग–व्यापार वृद्धीस हातभार लावावा, अशी अपेक्षा पत्रात व्यक्त करण्यात आली आहे.

रुहाटिया यांच्या निवडीमुळे स्थानिक उद्योजकतेला नवे दालन खुले होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उद्योग धोरण, व्यापाऱ्यांचे प्रश्न, गुंतवणूक व निर्यातवृद्धी आदी विषयांवर 'एमएसीसीआयए' महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे या नियुक्तीमुळे अकोला जिल्ह्याच्या व्यापार–उद्योग क्षेत्राला लाभ होणार असल्याचे मानले जाते. या निवडीबद्दल विविध व्यापारी संघटनांकडून सिद्धार्थ रुहाटिया यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### विविध पदांचे मानकरी

विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष, डिआरयूसीसी साउथ सेंट्रल रेल्वेचे सदस्य, वायपीओ (युएसए) सदस्य यासारखी विविध पदे भुषवली आहेत. याशिवाय त्यांचा विविध शासकीय, खासगी संस्थांकडून गौरव झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांनी एआयडी अवार्डने गौरवांकित केले आहे. तसेच व्हिआयए कडून लार्जस्केल इंडस्ट्री अवार्डने सन्मानित केले आहे.

## आनंदयात्री उपक्रमातून विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण

वि. प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोट :** आयुष्यातील आनंदाचे क्षण इतरांसोबत वाटल्यास तो अधिक द्विगुणीत होतो, या भावनेतून अकोट नगरपरिषदेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी 'आनंदयात्री' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत भेटवस्तू देणाऱ्या नागरिकांना 'आनंदयात्री' म्हणून संबोधण्यात येणार असून, त्यांची नोंद नगरपरिषदेच्या शिक्षण विभागात ठेवली जाणार आहे. ही यादी दर महिन्याच्या अखेरीस प्रसिद्ध केली जाणार आहे.

या उपक्रमासाठी प्रशासन अधिकारी सुनील तरोळे यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नगराध्यक्षा माया धुळे व मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी शहरातील नागरिक, दानशूर व्यक्ती, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था यांना या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांनी आपला किंवा आपल्या प्रियजनांचा वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस अथवा अन्य आनंदाचा दिवस नगरपरिषदेच्या शालेय विद्यार्थ्यांसोबत साजरा करावा. विद्यार्थ्यांसोबत काही क्षण घालवत त्यांना शैक्षणिक उपयोगाच्या भेटवस्तू देऊन आनंद वाटावा, अशी संकल्पना आहे. भेटवस्तूंमध्ये शालेय गणवेश वगळता वही, पेन, अवांतर पुस्तके, चित्रकलेचे साहित्य, स्कूल बॅग, पाणी बॉटल, टिफीन बॉक्स तसेच शाळेसाठी वॉटर फिल्टर, डिजिटल बोर्ड यापैकी एक किंवा अधिक वस्तू देता येणार आहेत.

आयुष्यातील छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधत सकारात्मकतेकडे पाहण्याची प्रेरणा देणारा आणि इतरांनाही आनंद देण्याचा प्रयत्न करणारा हा 'आनंदयात्री' उपक्रम आहे. शिक्षणाची गोडी वाढविण्यासाठी नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी केले आहे.

## श्री समर्थ पब्लिक स्कूल रिधोराच्या विद्यार्थ्यांची मतदार जागृती प्रभातफेरी

### मतदारांना जागृत करण्यासाठी घेतला पुढाकार




वि. प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोला:** रिधोरा येथील श्री समर्थ पब्लिक स्कूल अकोलाच्या वतीने महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोलेकर नागरिकांमध्ये मतदान करण्याबाबत जनजागृतीपर प्रभातफेरीचे आयोजन केले होते. अतिशय चांगला प्रतिसाद शिस्तबद्ध प्रभातफेरीला मिळाला. ही प्रभातफेरी जुन्या शहरातील श्रीवास्तव चौक ते डाबकी रोडवरील नंदाने मंगल कार्यालय पर्यंत काढण्यात आली. या प्रभातफेरीत विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्राचार्य, उपप्राचार्य व काही पालकांचाही सहभाग होता. प्रभातफेरीचे उद्घाटन डाबकी रोड पोलीस ठाण्याचे ठाणेदार कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मतदान आणि मतदार जन-जागृतीबाबत घेतलेल्य उपक्रम हा अत्यंत कौतुकास्पद असल्याचे ठाणेदार कोळी म्हणाले. प्रभातफेरीच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे प्रमुख प्रा. नितीन बाठे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या प्राचार्य डॉ. उषालता वानखेडे, उपप्राचार्य प्रेमेंद्र पळसपगार यांच्यासह सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी दीपक काटेकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवर्गाने अथक परिश्रम घेतले. सावित्रीबाई फुले यांची जयंती आणि तिथीनुसार राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून काढलेली ही प्रभात फेरी लोकशाहीला बळकट करण्यासाठी नक्कीच महत्वपूर्ण असल्याची प्रतिक्रिया जनतेकडून मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616

बातम्यासाठी संपर्क 9075012801

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


## शिक्षक नरसिंग रेगुलवाड यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

प्रतिनिधी ५ जानेवारी



**ढाणकी** : सहशिक्षक नरसिंग रेगुलवाड यांचा ३१ डिसेंबर २०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाली. त्याबद्दल शिक्षक मित्रमंडळींच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

नरसिंग रेगुलवाड यांनी आपली सहशिक्षक म्हणून चिखली (बु), ता. किनवट, ५ वर्ष ७ महिने ईजळी (नवीन), ता. मुदखेड ११ वर्ष निळा, ता. लोहा, ५ वर्ष पोखरभोसी, ता. लोहा ७ वर्ष ७ महिने अशो २९ वर्षांची सेवा पूर्ण केली. ते एक उपक्रमशील आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून ओळखले जातात.

# दगडाने ठेचून इसमाची हत्या; आरोपीला अटक

प्रतिनिधी ५ जानेवारी

■ यवतमाळ : घाटंजी मार्गावरील रेल्वे पटवली जंगलात दारू पिण्यासाठी गेलेल्या इसमाची दगडाने ठेचून हत्या केल्याची घटना आज सोमवारी अकरा वाजताच्या सुमारास उघडकिस आली. अवधूतवाडी पोलिसांनी काही तासाच्या आतच आरोपीला अटक केली.







जानराव मैंद य 55 रा. सावरगड असे मृतकाचे नाव आहे. प्रफुल्ल गजानन साखरकर रा. चापडोह, यवतमाळ असे आरोपीचे नाव आहे. ते दोघे घाटंजी मार्गावरील रेल्वे पटरीजवळ रविवारी रात्री दारु पिण्यासाठी गेले होते. दारु पिल्यानंतर त्या दोघात वाद निर्माण झाला होता. आरोपीने दगडाने ठेचून जानराव यांची हत्या केली. आज सोमवारी सकाळी १० ते ११ वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. या घटनेची माहिती मिळताच अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे ठाणेदार नंदकिशोर काळे व पोलीस अधिकारी, कर्मचा-यांनी घटनास्थळ गाठले. पोलिसांनी पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी शासकीय रुग्णालयात पाठविला आहे. यावेळी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनला पाचारण केले होते. पोलिसांनी घटनास्थळी साक्षीदारांचे दाखले घेऊन आवश्यक पुरावे गोळा केले. पोलिसांनी काही तासांतच आरोपी प्रफुल्ल साखरकर याला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. यावेळी घटनास्थळावर नागरिकांनी गर्दी केली होती.

# महागाव तालुक्यात वाघाची दहशत; गाय ठार

प्रतिनिधी ५ जानेवारी



**महागाव** : महागाव वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या शेनद परिसरात वन्यप्राण्यांचा धुमाकूळ सुरूच असून शनिवारी सकाळी वाघाने एका गाभण गाईवर हल्ला करून तिला ठार केल्याची घटना घडली. शेतकऱ्याच्या डोळ्यादेखत घडलेल्या या थरारक घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून वनविभागाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

शेनद येथील शेतकरी मनोहर धर्मा पवार हे शनिवारी सकाळी सुमारे दहा वाजताच्या सुमारास आपली गाभण गाय चारण्यासाठी शेतालगतच्या जंगल परिसरात घेऊन गेले होते. गाय चरत असतानाच दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक तिच्यावर झडप घातली. हा प्रकार पाहून पवार घाबरून गेले. स्वतःचा जीव वाचवण्यासाठी त्यांनी घटनास्थळावरून पळ काढला, त्यामुळे त्यांचा जीव वाचला; मात्र काही दिवसांत वासराला जन्म देणाऱ्या गाईचा जागीच मृत्यू झाला.

शेनद, धारेगाव, धारमोहा, बेलदरी व टेंभुरधरा हा परिसर जंगलव्याप्त असून येथे वाघाचा वावर वाढत चालल्याने शेतकरी शेतात जाण्यास घाबरत आहेत. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच धारेगाव परिसरात वाघाने एका वासरालाही ठार केल्याची घटना घडली होती. याआधी मोहदी व सातघरी शिवारात बिबट्याच्या हल्ल्यांमुळेही दहशत निर्माण झाली होती. सततच्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून वाघ व बिबट्यांचा बंदोबस्त करण्यात वनविभाग अपयशी ठरत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. नरभक्षक होण्याआधीच संबंधित हिंस्र प्राण्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी आता शेनद व परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्प : अन्यायकारक अतिरिक्त भूसंपादनाला विरोध

प्रतिनिधी ५ जानेवारी



**उमरखेड** : वर्धा–यवतमाळ–नांदेड रेल्वे मार्गासाठी प्रस्तावित अतिरिक्त भूसंपादनाच्या नोटिसांविरोधात उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला आहे. अन्यायकारक दर व अपारदर्शक प्रक्रियेविरोधात रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी स्थानिक विश्रामगृह येथे एकत्र येत जाहीर निषेध नोंदवला.

दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यवतमाळ यांनी तलाठ्यांच्या माध्यमातून दिलेल्या अतिरिक्त भूसंपादनाच्या नोटिसा शेतकऱ्यांनी स्वीकारण्यास नकार देत त्या परत केल्या. या भूसंपादनात मालेगाव, बिटरगाव, दहागाव, बेलखेड, कैलासनगर, कुपटरी, पळशी, नागापूर, मुळावा तरोडा, दत्तनगर व कळमुला या गावांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांनी सांगितले की, सन २०१८ मध्ये पहिल्या टप्प्यात प्रति एकर १६.५० लाख रुपयांचा दर देण्यात आला होता; मात्र २०२५ मधील अतिरिक्त भूसंपादनासाठी केवळ १५ लाख रुपये प्रति एकर दर जाहीर करण्यात आल्याने तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. वाढती महागाई, जमिनीची सुपीकता, स्थान व बाजारमूल्य याकडे दुर्लक्ष करून सरसकट दर लावण्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

न्याय्य दर, वर्गवारीनिहाय मूल्यांकन व पारदर्शक प्रक्रिया राबविल्याशिवाय कोणतीही नोटीस स्वीकारली जाणार नाही, असा ठाम इशारा संजय बिजोरे पाटील, केशवराव सूर्यवंशी, परमेश्वर कदम, बालाजी नरवाडे, देविदास वावुतकर, शिवाजी नजरधने, नानाराव कदम, रामदास हुबे, आकाश बरडे, निरंजन जाधव, ओमप्रकाश चव्हाण व मोहन देशमुख यांच्यासह शेतकऱ्यांनी दिला.

# पुसदमध्ये आमदार चषक बॅडमिंटन स्पर्धेचे दिमाखात उद्घाटन

प्रतिनिधी ५ जानेवारी



**पुसद** : क्रीडाप्रेमींना पर्वणी ठरलेल्या आमदार चषक बॅडमिंटन स्पर्धेचे भव्य उद्घाटन शुक्रवारी (ता. ३) येथील यशवंत स्टेडियमवर उत्साहपूर्ण वातावरणात झाले. शहरासह परिसरातील खेळाडू, क्रीडाप्रेमी व नागरिकांच्या उपस्थितीमुळे उद्घाटन सोहळ्यास विशेष रंगत आली.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी आशिष बीजवाल होते. प्रमुख पाहुणे म्हणून पुसद बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. दयाराम जाधव, विश्वनाथसिंग बयास नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष निशांत बयास, नवनिर्वाचित नगरसेविका शिल्पाताई देशमुख, नगरसेवक अभिजीत पानपट्टे व निखिल गादेवार उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात बीजवाल यांनी क्रीडा संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित केले. खेळामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते. युवकांसह महिलांनीही खेळात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. दयाराम जाधव यांनी पुसद शहरातील क्रीडा सुविधांच्या कमतरतेकडे लक्ष वेधले. शहरात सध्या केवळ एकच बॅडमिंटन कोर्ट असून, त्यावर विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जात असल्याने खेळाडूंना नियमित सरावासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. दिग्रस व उमरखेडप्रमाणे पुसद येथेही आधुनिक व सुसज्ज बॅडमिंटन कोर्ट उभारावे, अशी मागणी त्यांनी केली.

या आमदार चषक स्पर्धेत हैदराबाद, वाशिम, चंद्रपूर, भंडारा, दिग्रस, हिंगोली, यवतमाळ तसेच पुसद येथील संघ सहभागी झाले असून, राज्यातील नामवंत खेळाडूंच्या सहभागामुळे स्पर्धेला विशेष आकर्षण लाभले आहे. उद्घाटनप्रसंगी ईशान चव्हाण, अभिजीत बासटवार, मंगेश मुगवानकर, कौस्तुभ पांडे, रितेश मुगवानकर, मनीष दशरथकर, नंदू देशमुख, लुकेश पोरकुटे, ललित जाधव, वरद नेसनातकर, मोहित असवानी, वेदांत बोधनकर, सुनील राठोड यांच्यासह अनेक क्रीडाप्रेमी, खेळाडू व प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आर्णी ग्रामीण रुग्णालयाला प्रसूती कक्ष गुणवत्ता सुधारणा पुरस्कार

प्रतिनिधी ५ जानेवारी



**आर्णी** : ग्रामीण रुग्णालय, आर्णी यांना प्रसूती कक्ष गुणवत्ता सुधारणा उपक्रमांतर्गत प्रथम पारितोषिक मिळाले आहे. हा पुरस्कार लेबर रूम क्वालिटी इम्प्रुव्हमेंट उपक्रमाद्वारे माता व नवजात शिशु मृत्युदर कमी करणे तसेच आधारयुक्त मातृत्व पद्धतींना चालना देण्यासाठी घेतलेल्या कामगिरीसाठी देण्यात आला आहे.

डॉ. रमा बाजोरियाच्या नेतृत्वाखाली रुग्णालयातील संघटित प्रयत्नांमुळे हा यशस्वी टप्पा गाठला गेला. यश मिळवण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक, आर.एम.ओ., डीक्यूएसी, क्यू.ए. आणि जी.डी. पी.एम. यांच्या मार्गदर्शनाचे मोठे योगदान आहे. तसेच माजी वैद्यकीय अधीक्षकाने कार्यक्रमाचा भक्कम पाया रचून सतत प्रेरणा दिल्याबद्दल विशेष आभार.

रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी, जसे की डॉ. आशिष पाटील, डॉ. शुभांगी बोरकर, रंजीता कार्लेकर, राहुल मोहिते, अमोल चव्हाण, अभिजीत खंडारे, हर्षद दुद्दलवार, शंकर टोपे, बाळासाहेब लोखंडे, अनुप तपासे, भास्कर मुलाने, विशाल शेजव, पुरुषोत्तम गुडे यांचे योगदान या यशात महत्वाचे ठरले. ग्रामीण रुग्णालय, आर्णी येथील सर्व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित परिश्रमांमुळे हा यशाचा टप्पा साध्य झाला असून, आगामी काळातही माता-बाल आरोग्य सेवेत उत्कृष्टता टिकवून ठेवण्याचा रुग्णालयाचा संकल्प आहे.

# मुख्यमंत्री पंचायतराज अभियानात ग्रामपंचायत आंबोडाची पाहणी

प्रतिनिधी ५ जानेवारी

**आर्णी** : मुख्यमंत्री पंचायतराज अभियानाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद यवतमाळचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांनी ग्रामपंचायत आंबोडा येथे भेट देऊन ग्रामपंचायतीतील विविध विकासकामांचा सखोल आढावा घेतला. अभियानांतर्गत सुरू असलेल्या योजनांची प्रत्यक्ष पाहणी करून कामांच्या गुणवत्तेवर भर देण्यात आला.

भेटीदरम्यान स्वच्छता, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, अंतर्गत रस्ते, सार्वजनिक सुविधा तसेच ग्रामस्तरीय प्रशासकीय कामकाजाचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. सुरू असलेल्या कामांची प्रगती, निधीचा योग्य वापर व वेळेत कामांची पूर्तता याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांकडून माहिती घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या. मुख्यमंत्री पंचायतराज अभियानाचा मुख्य उद्देश कामांचा थेट लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा असून, ग्रामपंचायतींनी गुणवत्ता, पारदर्शकता व लोकसहभागावर भर देत नियोजनबद्ध कामकाज करावे, असे संतोष धोत्रे यांनी सांगितले. त्रुटी आढळल्यास तातडीने दुरुस्ती करून कामे अधिक परिणामकारक करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

यावेळी पंचायत समिती आर्णीचे गटविकास अधिकारी रमेश खरोडे, विस्तार अधिकारी ईश्वरसिंह बघेल, बाळकृष्ण ठाकरे, नरेगा कार्यक्रम समन्वयक जय राठोड, सरपंच वर्षाताई आडे, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# श्री शिवाजी विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती

प्रतिनिधी ५ जानेवारी



**महागाव** : भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका, मुख्याध्यापिका व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सवना येथे शनिवार (ता. ३) रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या राऊत उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून रोडगे, दीपा देशमुख, श्रद्धा देशमुख, श्रद्धा चव्हाण आणि गोरे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा दांडेकर यांनी केले, तर प्रास्ताविक राजलक्ष्मी गावंडे यांनी मांडले. यावेळी 'सावित्रीच्या लेकी' म्हणून अनेक विद्यार्थिनींनी सहभाग घेत सावित्रीबाई फुले यांनी महिलांच्या शिक्षणासाठी व वंचितांच्या हक्कांसाठी केलेल्या संघर्षाची माहिती सादर केली.

अध्यक्षीय भाषणात राऊत यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे महिलांना शिक्षणाचा अधिकार, समाजात मान-सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त झाल्याचे नमूद केले. स्त्री शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी विद्यार्थिनींना सावित्रीबाईंच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जानवी दळवी यांनी केले. या प्रसंगी विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावित्रीमाईंच्या विचारांचा वारसा जपत 'स्वागत स्त्री जन्माचे'

प्रतिनिधी ५ जानेवारी




**उमरखेड** : "साऊ पेटती मशाल, साऊ आग ती जहाल..." या प्रेरणादायी विचारांचा वसा घेत इंटरनॅशनल आयकॉन पुरस्कार व ISO मानांकन प्राप्त जिव्हाळा संस्था मागील बारा वर्षांपासून 'स्वागत स्त्री जन्माचे' हा समाजप्रबोधनाचा उपक्रम सातत्याने राबवत आहे. या उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत १६१२ कन्यारत्नांचा व त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला आहे.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे व राष्ट्रीय बालिका दिनाचे औचित्य साधून यंदाच्या उपक्रमाची सुरुवात उमरखेड येथील राजाराम उत्तरवार उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आली. यावेळी जि. प. कन्या शाळा, विडूळ येथील शिक्षिका सौ. संगीता अतुल मादावार (मांजरे) यांच्या हस्ते नवजात कन्यारत्नाचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी कन्यारत्नाला ड्रेस, आईला ब्लाउज पीस, वडिलांना शेला, पेडा व पुष्पगुच्छ देऊन उमरखेड तालुक्यातील कन्यारत्न जन्मलेल्या माता–पित्यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्ष अतुल लताताई राम मादावार यांनी सांगितले की, कन्यारत्नाचा जन्म हा आनंदाचा क्षण असावा, हीच भावना घेऊन हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. ग्रामीण भागात सुरक्षित प्रसूती शासकीय रुग्णालयातच व्हावी, मुलगी ही कुटुंबाची ताकद आहे, हा विचार रुजवणे हेच संस्थेचे ध्येय असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष अतुल लताताई राम मादावार, सल्लागार सौ. संगीता अतुल मादावार, अधिपरिचारिका रिठे, तसेच चंद्रकांत खेवलकर, श्रीकांत शहा, अभय उबाळे आदी उपस्थित होते.

# माथार्जुन शाळेत वाद; निधीचा हिशेब न दिल्याने संशय

## प्रभारी मुख्याध्यापकांच्या वर्तनावर पालकांचा संताप

प्रतिनिधी ५ जानेवारी

**झरी** : माथार्जुन येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळा व्यवस्थापन समितीच्या (SMC) बैठकीदरम्यान झालेल्या प्रकारामुळे ग्रामस्थ व पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शालेय कामकाज, शासकीय निधीचा वापर व प्रशासकीय पारदर्शकतेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे न मिळाल्याचा आरोप प्रभारी मुख्याध्यापकांवर करण्यात आला आहे.

इयत्ता ४ थी व ७ वी शिष्यवृत्ती नोंदणी, क्रीडा साहित्याचा वापर, सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन व शालेय सहल या विषयांवर चर्चा करण्यासाठी ३ जानेवारी रोजी सकाळी ८.३० वाजता SMC बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक तसेच ग्रामपंचायतीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान उपस्थितांनी शाळेच्या कारभारासंदर्भात प्रश्न उपस्थित केले असता प्रभारी मुख्याध्यापक टिगणे यांनी मुद्द्यांवर चर्चा न करता विषयांतर केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यावेळी पालकांमध्ये गैरसमज पसरवणे, पत्रकारितेबाबत आक्षेपार्ह विधाने करणे तसेच वैयक्तिक पातळीवर टीका केल्याचेही आरोप झाले. बैठकीत शासकीय निधी, शाळेचे व्यवस्थापन व प्रशासकीय बाबींवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते; मात्र नंतर तयार करण्यात आलेल्या कार्यवृत्तात हे मुद्दे नमूद करण्यात आले नसल्याचा आरोप SMC सदस्यांनी केला आहे. तसेच मागील व चालू वर्षातील शासकीय निधीचा तपशील देण्यास लेखी व तोंडी नकार दिल्याचेही सांगण्यात आले.

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत शाळेस १ लाख निधी प्राप्त झाल्याची माहिती असून, त्या निधीचा खर्च व शिल्लक रक्कम याबाबत कोणतीही माहिती समितीसमोर सादर करण्यात आली नसल्याचा आरोप आहे.

याशिवाय २५ हजार अतिरिक्त निधी मिळाला की नाही, याबाबतही स्पष्टता नसल्याने आर्थिक पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

बैठकीदरम्यान अपमानास्पद हावभाव व असंयमी वर्तन केल्याचा आरोप करत पालक व ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. हा प्रकार लोकशाही मूल्यांना व शासकीय सेवकांच्या आचारसंहितेला धरून नसल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी दिली.

या प्रकरणाची तातडीने स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी जागरूक नागरिक योगेश मडावी यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी केली आहे.

बैठकीस सरपंच रवींद्र कायतावर, SMC अध्यक्षा रुंदाताई गेडाम यांच्यासह ग्रामस्थ व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि.५ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अर्थपूर्ण संबंधातून वाढली मुजोरी, गावठाण हद्दीत घुसखोरी !

*** 'त्या' अतिक्रमित विहीरीचा चौकशी अहवाल मागितला**
*** जिल्हाधिकारी ( गृह शाखा) कार्यालयाने घेतली दखल**

● सिटी न्युज ब्युरो वाशीम ●

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील ' पोखरा ' प्रकरण संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला आहे. त्यातच आता गावठाण हद्दीत अतिक्रमण करून खोदलेल्या विहिरीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. पोकरातील गैरव्यवहार आणि अतिक्रमित विहीरीच्या नावावर शासनाच्या विविध कृषी योजनांचा घेतलेला लाभ याबाबत वरिष्ठ स्तरावर गावातून तक्रार दाखल करण्यात आली होती. सदर तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालय ( गृह शाखा ) यांनी उपजिल्हाधिकारी रोहयो आणि जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणाची चौकशी करून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यासंदर्भात एक पत्र दिले आहे. सदर पत्र तक्रारदार यांना सुद्धा मिळाले असल्याची माहिती समोर येत आहे.

रिसोड तालुक्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजना अर्थात पोखरा योजनेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या बाबत शेलुखडसे येथील शेतकरी वसंत खडसे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रधान सचिव मुंबई व जिल्हाधिकारी वाशिम यांच्यासह कृषी संचालक, सहसंचालक यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. सदर प्रकरणाची जिल्हास्तरावरून प्राथमिक चौकशी सुरू झाली असून तपास अधिकारी तथा तंत्र अधिकारी अनिल राठोड यांनी गट नंबर ६०२ व गट नंबर ६३३ मधे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली आहे. तक्रारीत नमूद करण्यात आलेल्या मुद्द्यांची बारकाईने पाहणी केली आहे. त्याबाबतचा अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती संबंधितांनी दिली आहे.





सदर तक्रारीसोबतच शेलुखडसे येथील गट नंबर ६०२ मधील एक विहीर गावठाण हद्दीत असल्याची सुद्धा तक्रार करण्यात आली होती. परंतु विशेष बाब म्हणजे सदर विहीर गावठाण हद्दीत अतिक्रमित असून देखील खाजगी सात बारावर कशी ? हा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. शिवाय या अतिक्रमित विहीरीच्या नावावर शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यात आला असून या गुंतागुंतीच्या गंभीर प्रकाराची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.

या बाबत जिल्हाधिकारी कार्यालय, गृह शाखा वाशिम यांनी उपजिल्हाधिकारी रोहयो व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वाशिम यांना कक्ष - ८/निवेदन/गृह/मह. सहा./कावि - १०३०/२०२५ पत्र दिले आहे. सदर पत्रसोबत प्राप्त झालेल्या निवेदनाची सहप्रत जोडून संदर्भांकित विषयाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा असे कळविण्यात आले आहे.




## थोडक्यात

### श्री संत झोलेबाबा यात्रा महोत्सवात उसळला भाविकांचा जनसागर

**लाखो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ**

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर तालुक्यातील चिखली झोलेबाबा येथे भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री संत झोलेबाबा यांचा ६१ वा यात्रा महोत्सव



दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा ०३ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परिसरातील भाविकांनी दर्शना सोबतच महाप्रसादाचा लाभ घेतला. यात्रा महोत्सवाच्या ठिकाणी व्यापाऱ्यांची रेलचे व भाविकांची गर्दी या भक्तिमय आनंदाच्या वातावरणत यात्रा महोत्सव साजरा झाला मंदिरातच नव्हे; तर बाहेरही दर्शन बारीत मोठ्या संख्येने भाविक उभे होते. सकाळी ६ वाजता आरती नंतर पालखीची वाजत गाजत गावामध्ये मिरवणूक काढण्यात आली यावेळी, गावात ठिकाणी ठिकाणी पूजन करून नागरिकांनी दर्शन घेतले. दुपारी ४ वाजता जमलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या साठी संस्थांनच्या वतीने ८१ क्विंटल पुरी व भाजीचा महाप्रसाद भाविकांसाठी तयार करण्यात आला होता. महाप्रसाद वितरण करण्या साठी जवळ जवळ ७० ट्रॅक्टर व परिसरातील शेकडो स्वयंसेवक सहभागी झाले होते. तसेच शेलुबाजार येथून भाविकांना जाण्या-येण्या साठी परिसरातील काही वाहनधारकांनी आपली वाहने मोफत उपलब्ध करून दिले होते. तसेच महाप्रसाद घेणाऱ्या नागरिकांना पाण्याची उपलब्धता महाप्रसाद परिसरातच व्हावी या साठी मारवाडी युवा मंच व दानशूर लोकाकडून दरवर्षीन प्रमाणे याही वर्षी पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करण्यात आले. या सह तालुक्यातील हिरंगी शेलुबाजार, इचा- नागी, कंझरा, पिंपरी, चिखली, गोगरी, लाठी इतर ठिकाणा वरून नागरिकांनी आपापल्या वाहनात मध्ये पाण्याचे टँकर व पाण्याच्या टाक्या भरून भक्ता करिता पाणी उपलब्ध केले यात्रा महोत्सवा मध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याकरिता मंगरूळपीर पोलीस स्टेशन चे ठाणेदार किशोर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त करण्यात आला होता.

# रिसोड तहसील कार्यालयात भ्रष्टाचार, अधिकारी पैशासाठी लाचार !

***जवळा येथील रमेश चाटे यांच्या वडीलोपार्जित शेतीचा परस्पर फेरफार**
*** तलाठी, मंडळ अधिकारी आणि नायब तहसिलदाराचे संगनमत**

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

वाशीम जिल्ह्यातील सर्व तालुक्यात महसूल प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर आधीच प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे.त्यामध्ये रिसोड तालुक्यातील जवळा येथील रमेश चाटे व त्यांच्या नातेवाईकांची वडीलोपार्जित जमिनीचा फेरफार तत्कालीन तलाठी, मंडळ अधिकारी आणि नायब तहसिलदार यांनी प्रतिस्पर्धी व्यक्तींकडून मोठ्या प्रमाणात मलिदा लाटून परस्पर केल्याचा अजब प्रकार उघडकीस आला आहे.या प्रकाराने रिसोड तहसिलचा भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर आल्याची चर्चा आहे. या अजब प्रकाराची तक्रार राज्याचे महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पुराव्यासह करणार असल्याची माहिती रमेश चाटे यांनी दिली आहे.

रिसोड तालुक्यातील मौजे-जवळा येथे गट क्रमांक ५/१ मध्ये रमेश चाटे व त्यांचे ९ नातेवाईकांच्या नावे एक हेक्टर १६ आर सामाईक जमिन आहे.ही



जमिन चाटे कुटुंबियांची वडीलोपार्जित असून 'त्या' जमिनीचा फेरफार १९६९ सालातील दस्त क्रमांक २९९/१९६९ च्या खरेदीखतानुसार व फेरफार क्रमांक ६७ मंजूर दिनांक ०६/०६/१९८५ नुसार गणा सेवा जाधव यांच्या नावाने केला असल्याची नोंद दिनांक ०७/०७/२०२५ रोजी झाल्याची नोंद ही बनावट फेरफारात नमूद केलेली आहे. उल्लेखनिय म्हणजे या बनावट फेरफाराची चाटे कुटुंबियांतील कोणत्याही सदस्यास नोटीसही देण्यात आली नाही. तसेच या बनावट फेरफारामध्ये दिनांक ०५/०७/२०२५ रोजी हितसंबंधितांना नोटीस बजावल्याचे नमूद असून हा फेरफार अवघ्या दोन दिवसातच तत्कालीन भ्रष्ट मंडळीने मंजूर केल्याचीही नोंद या बनावट फेरफारामध्ये नमूद असल्याने रिसोड तालुक्यातील महसूल विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.राज्याचे कर्तव्यदक्ष महसूलमंत्री ना.बावनकुळे 'या' प्रकरणाची दखल घेवून रिसोड तहसिलमधील मागील पाच वर्षातील सर्वच फेरफारासह जमिनीच्या प्रकरणाची सखोल चौकशी करणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

# चिखली येथील यात्रेत मंगळसूत्राची चोरी

**दोघी विरुद्ध गुन्हा दाखल ; मंगरूळपीर तालुक्यातील घटना**

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर तालुक्यातील चिखली येथील यात्रा महोत्सव मध्ये ता ३ रोजी महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरीची घटना घडली असून याप्रकरणी पोलिसांनी दोघी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फीर्यादी मालती भगवान व्यवहारे वय ३० रा इचोरी यांनी फिर्यादी असे नमूद केले की या झोलेबाबा चिखली येथे यात्रेकरीता आल्याने सायंकाळी ४ वाजता यात्रे मध्ये महाप्रसाद घेतला व यात्रेमध्ये गेले असता भांड्याचे लाईनमध्ये गर्दी मध्ये फिर्यादीच्या गळ्यातली पोथ एका मुलीने तोडली तर फिर्यादीच्या लक्षात आले. तेव्हा आरडा ओरड केली तर काही बाया पळत होत्या. सदर पळणा-या महिलेच्या गळ्यातील तसेच अंगावरील एकुन ३१ ग्रॅम ४४० मीली सोण्याचे दागीने चोरीस गेले एकुन किंमत १५७२०० रुपयेचा माल चोरी गेला तसेच एकुन किंमत १५७२०० रुपयेचा माल चिखली झोलेबाबा यात्रेमध्ये चोरी करतांना लोकांनी दोन महीला यांना पकडले.

त्यांची पोलीस स्टेशनमध्ये अंगझडती घेतली असता त्यांच्याजवळ ३ ग्रॅम ७२० सोन्याचे दागिने अंदाजे किंमत ५३०० रुपयाचा मुद्देमाल आढळून आला त्यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक किशोर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली विजय डोंगरे करीत आहेत.

# चालक-वाहकांच्या मनमानीमुळे प्रवाशांचे हाल !

**लालपरीचा मेडशी गावाला खो:प्रशासनाचे दुर्लक्ष !**

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

एसटी महामंडळाची लालपरी ही ग्रामीण जनतेची जीवनवाहिनी मानली जाते. मात्र, अकोला ते वाशिम या मार्गावर धावणाऱ्या बसच्या चालक आणि वाहकांनी सध्या आपली मनमानी चालवली मेडशी गावातील प्रवाशांना वाऱ्यावर सोडले आहे. अनेक बसेस मेडशी गावामध्ये न येता थेट बायपास मार्गाने नेल्या जात असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. एसटी प्रशासनाच्या या गलथान कारभाराचा फटका विद्यार्थी, नोकरदार आणि वयोवृद्ध नागरिकांना बसत असून, मेडशीवासीयांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. शेकडो

**नोकरदारांनाही कामावर पोहोचण्यास विलंब**

**अधिकारी लक्ष देतील का?**

अकोला आणि वाशिम आगारातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. चालक-वाहकांवर कोणाचाही वचक राहिला नसल्याचे चित्र दिसत आहे. जर बस गावामध्ये येणार नसेल, तर त्या मार्गाचे नियोजन तरी कशासाठी? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

केवळ वेळ विद्यार्थी शिक्षणासाठी अकोला किंवा वाशिम येथे दररोज ये-जा करतात. वेळेवर बस मिळेल या आशेने हे विद्यार्थी बस स्थानकावर तासनतास ताटकळत उभे असतात. मात्र, चालक आणि वाहक वाचवण्यासाठी किंवा सोयीसाठी बस थेट महामार्गावरून (बायपास) पुढे नेतात. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, अनेकदा त्यांची महत्त्वाची व्याख्याने आणि परीक्षांना मुकावे लागत आहे.

होत असल्याने त्यांच्या रोजगारावर टांगती तलवार निर्माण झाली आहे. गावच्या बस स्थानकापर्यंत जाण्यासाठी प्रवाशांना आधीच कसरत



करावी लागते, त्यात बस स्थानकात न येता बायपासवरून जात असल्याने प्रवाशांना भर उन्हात किंवा रात्री-अपरात्री दोन ते तीन किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. महिला आणि वृद्ध प्रवाशांची अवस्था तर अत्यंत दयनीय झाली आहे. 'आम्ही एसटीचे अधिकृत तिकीट काढतो, तरीही आम्हाला ही सापत्न वागणूक का?' असा संतप्त सवाल मेडशी येथील नागरिक विचारत आहेत.

## जलजीवन नव्हे तर, जल मरण मिशन...


# शासनाचा दोष, कंत्राटदारावर रोष !

● दिपक मापारी @ रिसोड ●

मागील दोन-तीन वर्षांपूर्वी केंद्र शासनाने जिल्हा पाणीपुरवठा विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोठा गाजावाजा करून, जल जीवन मिशन योजना कार्य विनीत केली परंतु ही जल जीवन मिशन योजना स्पेशल फेल ठरले असल्याचे ग्रामीण भागात दिसून येत असून एक प्रकारे या योजनेचा फज्जा उडाला असल्याचे दिसून येत आहे.

हर घर जल, घर घर नल या वाक्याची घोषणा करून केंद्र सरकारने जलजीवन मिशनचा मोठ्या प्रमाणावर उदो उदो केला. मात्र ग्रामीण भागातील ही योजना एकही पूर्णतत्त्वाकडे न येता शेकडो पेक्षा अधिक कामे निधी अभावी कॉन्ट्रॅक्ट दाराने अर्धवट परिस्थितीत सोडल्याने त्याचा प्रचंड मनस्ताप ग्रामीण भागातील जनतेला सहन करावा लागत आहे.

**ग्रामीण भागात जलजीवन योजनेचा उडाला फज्जा**



शासनाच्या या उदासीन धोरणामुळे जल जीवन नव्हे तर, जल मरण मिशन ठरल्याची प्रतिक्रिया सामान्य माणसातून उमटू लागले आहेत. ग्रामीण भागातील सर्वच ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात या योजनेचा फज्जा उडाल्याचे चित्र असून काही ठिकाणी पाण्याची टाकी उभी तर, विहीर नाही, आणि विहीर झाली तर, नळ जोडणी नाही. अशी विपरीत परिस्थिती ग्रामीण भागात निर्माण झाली आहे. ज्याप्रमाणे जाहिरातीच्या माध्यमातून या जल जीवन मिशन योजनेची प्रसिद्धी करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रत्यक्षात मात्र जोमात कामे पूर्णतत्त्वास आली नाहीत. जल जीवन मिशनचे कामे मंजूर करून त्याची मोठ्या प्रमाणावर मार्केटिंग केल्याने नागरिकांना नळ योजनेचे शुद्ध पाणी घरापर्यंत येण्याची आशा निर्माण झाली होती. परंतु मागील तीन ते चार वर्षापासून ही कामे काही केल्यास पूर्ण होईनात उलट या जल जीवन मिशन योजनेमुळे प्रत्येक गावात असलेले सुंदर व स्वच्छ रस्ते कंत्राटदाराने फोडून चांगल्या रस्त्याचा नाश केला. त्यामुळे नागरिकांच्या समस्या प्रचंड वाढ होऊन गावातील सांडपाणी फोडलेल्या मुख्य रस्त्याने वाहत असून त्यामुळे गावातील नागरिक या सांड पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. एकंदरी शासनाने या योजनेची प्रत्यक्ष अमलबजावणी पेक्षा प्रचार व प्रसादावरच अधिक भर दिल्याने या योजनेचा बोजवारा उडाला आहे. ग्रामीण भागातील गावागावात या जल जीवन योजनेच्या नळ योजनेसाठी गावातील चांगले सिमेंट रस्ते पेवर ब्लॉक रस्ते फोडण्यात आले. मात्र त्यानंतर ते रस्ते दुरुस्त करायला कंट्रकदार तयार तयार झाले नाहीत. उलट शासनाकडून निधी मिळत नसल्याने सर्व कंत्राटदारांनी सामूहिक रित्या जलजीवन मिशनची कामे पूर्णता बंद करून ठेवली आहेत. आता योजना अर्धवट असल्याने पाण्यासाठी नागरिक ग्रामपंचायत आणि तेथील सरपंचावर रोष व्यक्त करीत आहेत. ही योजना आता जलजीवन नव्हे तर, जल मरण मिशन ठरल्याची प्रतिक्रिया सामान्य जनतेतून उमटत लागली आहे. एकंदरीत शासनाने जलजीवन मिशन या योजनेला भरीव निधी उपलब्ध करून पुनशच एकदा या योजनेचा प्रारंभ करून अर्धवट असलेली कामे पूर्ण करून नागरिकांना शुद्ध पाणी देण्याची गरज निर्माण झाली आहे.

# परिविक्षाधिन जिल्हाधिकारी आकाश वर्मा यांची मेडशी ग्राम संसद भवनला भेट

● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●

वाशीम जिल्ह्यातील एकमेव डिजिटल ग्रामपंचायत असलेल्या मेडशी ग्रामसंसद भवनला परीक्षावधिन जिल्हाधिकारी तसेच सध्याचे मालेगाव गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत असलेले आकाश वर्मा यांनी आज भेट देऊन ग्रामपंचायत कार्यालयाची पाहणी केली.

व गावातील स्वच्छता व विकास कामाबाबत चर्चा केली.यावेळी सरपंच शेख जमीर यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध योजनेच्या व कामाची प्रत्यक्ष पाहणी करता मालेगांव पंचायत समिती गटविकास अधिकारी आकाश वर्मा यांनी २ जानेवारी रोजी मेडशी ग्रामपंचायतला भेट दिली.या भेटीदरम्यान त्यांनी गावातील स्वच्छता व विकास कामाची पाहणी केली.तसेच आवश्यक ते मार्गदर्शन यावेळी केले. ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत राबविण्यात आला.आता या अभियानाला ३१ मार्च पर्यंत मुदतवाढ सुद्धा मिळाली असल्याचे आकाश वर्मा यांनी सांगितले.या अभियाना अंतर्गत



ग्राम पातळीवर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीसाठी बहुस्तरीय पुरस्कार ठेवण्यात आले.त्यात तालुका स्तरावर जिल्हा स्तरावर तसेच राज्यस्तरावर पुरस्कार ठेवण्यात आले.या भेटीदरम्यान त्यांनी गावातील स्वच्छता घरकुल तसेच विविध विकास कामावर चर्चा केली.तसेच गावातील महत्त्वाच्या समस्येवर सुद्धा चर्चेदरम्यान काही सूचना करून व लवकरच तोडगा काढण्याचे सुद्धा आश्वासन दिले.

यावेळी त्यांच्यासोबत पंचायत समितीचे सहायक गट विकास अधिकारी आर एस कंकाळ, विस्तार अधिकारी प्रमोद लोखंडे हे सुद्धा होते.तसेच गावातील लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, नागरिक व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि.५ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# निवडणूक साहित्य वितरणात सुसूत्रता असावी– मनपा आयुक्त लहाने

प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५-२६ अन्वये ३ जानेवारी रोजी मनपा आयुक्त डॉ. सुनिल लहाने यांच्याव्दारे त्यांच्या दालनात निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहा.निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासोबत विशेष बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीमध्ये ईव्हीएम मशीन आणि बॅलेट युनीट, सिलींगच्या अनुषंगाने तसेच पोस्टल बॅलेट संदर्भात माहिती घेण्यात आली. यावेळी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. लहाने

### ♦ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक; आयुक्तांच्या दालनात बैठक संपन्न



यांनी साहित्य वितरणामध्ये सुसूत्रता असावी, या कामामध्ये कोणत्याही प्रकारची घाई होऊ नये, याकडे विशेष लक्ष घालणे आदींबाबत सूचना दिल्या.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी मनोज लोणार, उपविभागीय अधिकारी, अकोट, शरद जावळे, उपविभागीय अधिकारी, अकोला, एस.एस. अपार, उपविभागीय अधिकारी, मूर्तिजापूर, संतोष येवलीकर, उपविभागीय अधिकारी, बाळापूर, विजय पाटील, विजय पाटील, उपजिल्हाधिकारी, रो.ह.यो., निखिल खेमनार, उपजिल्हाधिकारी महसूल,अकोला, मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, मनपा उपायुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे, मनपा सहा.निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल देवकते, देविदास निकाळजे, राजेश सरप, गजानन घोंगे, नंदीनी दामोदर, मनपा जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा आदींची उपस्थिती होती.

# पथनाट्याव्दारे मनपा व्दारा शहरातील विविध भागात मतदार जनजागृती



प्रतिनिधी ५ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात ४ जानेवारी रोजी नवीन बस स्थानक आणि संत तुकाराम चौक येथे लोककला व पथनाट्याव्दारे मतदार जनजागृती करण्यात आली.

यावेळी पातूर येथील स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठाण व युवाश्री विशाल राखोंडे लिखीत पथनाट्य व लोककला जनजागृती कार्यक्रमातून कलावंतांनी वासुदेव व गोंधळी आणि इतर विविध भूमिका घेऊन सर्वांचे लक्ष वेधले आहेत. यावेळी विविध पथनाट्य व लोकनाट्यातून आणि लोकगीतातून मंडळाचे अध्यक्ष लोककवी सागर राखोंडे, सुखदेव उपर्वट, प्रकाश इंगोले, गजानन आवटे, कैलास शिरसाट, गणेश देवकर, श्याम उगले, विष्णू सदार, प्रज्वल इंगळे यांनी सादर केले. 'अकोलेकर वोट कर' या घोष वाक्यातून आणि विविध लोकगीतातून व पथनाट्यातून मतदारांनी मतदान करण्यासाठी वृद्ध व दिव्यांग यांना मदत करण्याकरिता व मतदान टक्क्यात वाढ होण्याकरिता आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी मनपा शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी मतदार जनजागृती हरिश्चंद्र इटकर, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा, संजय खराटे, मो. अनवर हुसैन, सतीष वखारीया, हरिष चांडक, तुळशीराम गुंजकर, राजेश साळुंके, गौरव श्रीवास, विश्वनाथ सुतवणे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जेडी अग्रवाल स्टोनमेटलच्या हायटेक स्टोन क्रशर प्लँटचे भव्य उद्घाटन

प्रतिनिधी ५ जानेवारी




**अकोला :** औद्योगिक विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत जेडी अग्रवाल स्टोनमेटल या कंपनीचा अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित हायटेक स्टोन क्रशर प्लँट अकोला जिल्ह्यात सुरू करण्यात आला आहे. या प्लँटचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले.

या प्रकल्पाचे मालक श्री. जतीनजी अग्रवाल असून, प्लँटमध्ये आधुनिक व पर्यावरणपूरक यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. कमी धूळनिर्मिती, कमी आवाज, ऊर्जा बचत आणि अधिक उत्पादनक्षमता ही या हायटेक स्टोन क्रशर प्लँटची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

या प्लँटमुळे बांधकाम क्षेत्रासाठी उच्च दर्जाची खडी व स्टोन मटेरियल उपलब्ध होणार असून स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

तसेच शासनाच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करत पर्यावरण संरक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. यावेळी बोलताना जेडी अग्रवाल स्टोनमेटलचे मालक जतीन अग्रवाल यांनी सांगितले की, 'हा हायटेक स्टोन क्रशर प्लांट केवळ व्यवसायापुरता मर्यादित नसून परिसराच्या औद्योगिक, आर्थिक व सामाजिक विकासासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.'उद्घाटन प्रसंगी मान्यवर, व्यावसायिक, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

# शेगावला पायीवारी करणाऱ्या भाविक भक्तांना अन्नदान

प्रतिनिधी ५ जानेवारी

### ♦ मार्कस शोरूम मिस्टर डेनिम जठारपेठ मित्र मंडळाचा उपक्रम



**अकोला :** विदर्भाचे आराध्य दैवत असलेल्या संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी नवीन वर्षानिमित्त पायीवारी करणा-या भाविक भक्तांना मार्कस शोरूम मिस्टर डेनिम जठारपेठ मित्र मंडळाच्या वतीने अन्नदान करण्यात आले.

नववर्षाच्या आरंभी मंडळाच्या माध्यमातून स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला.

या कार्यक्रमासाठी शुभम गासे, तुषार कळमकर, चंद्रांशु मानकर, चेतन राऊत, अभिजीत काळे, सागर जामोदे, गणेश बोंडे, नंदू जिरेकर, संचित सुरोशे, शुभम घुसे, प्रशिक खोब्रागडे, योगेश कट्यारमल, आदित्य मोडक, शिवा अडायकर, श्रीकांत नवलकर, श्याम दाहे, गजानन शिंदे, यश कोरडे, देवा पाटील, ओम ठाकूर, दादू मोरे, मंथन उमाळे यांचे सहकार्य लाभले. या अन्नदानाचा शेकडो भाविकांनी लाभ घेतला.

# नाईक होमिओपॅथी येथे अनेक असाध्य आजारावर उपचार केले जातात

प्रतिनिधी ५ जानेवारी

### ♦ ॲडव्हान्स होमिओपॅथी उपचार रुग्णांसाठी गुणकारी

**अकोला :** येथील नाईक होमिओपॅथी मध्ये थॉयरॉईड , लठ्ठपणा, ॲसीडीटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधीवात, मायग्रेन, पिसीओडी सारख्या असाध्य आजारावर उपचार करून रूग्णांना पुन्हा जीवन प्रवाहात आणण्याचे कौशल्य आहे. ॲडव्हॉन्स होमिओपॅथीच्या उपचाराने आजमितीस हजारो रूग्णांनी त्याचा लाभ घेतलेला आहे. गेल्या ४० वर्षापासून नाईक होमिओपॅथी येथे शरीराच्या सर्व आजारावर सर्वांगीण यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रूग्णांना कुठेही फायदा झाला नाही. अश्या रूग्णांनी एकदा अवश्य भेट द्यावी अधिक माहिती मोबाईल क्र. ९१७५९५७१२९, ९१३००१६१२९ व Naikhomoeopathy.com (Youtube) वर माहिती घ्यावी.




रुग्णांनी अनुभव कथन केले आहे.

विनोद जगदाळे म्हणाले, मला थायरॉईड असल्याने वजन खुप वाढले होते. शरीर भारी भारी वाटायचे, बैठकीचे काम असल्यने पाय सुजले होते. सोशल मिडीयामध्ये नाईक होमिओपॅथीची जाहीरात बघीतल्याने येथे उपचार करण्याचे ठरविले. नाईक होमिओपॅथी येथे अडीच महिन्याच्या उपचारानंतर माझे वजन ८ किलो कमी झाले. शरीर हलके वाटायला लागले. पायाची सुज कमी झाली.

# निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १५ अ**

| | | |
|---|---|---|
| १५ अ | आलीमचंदानीहरीश रतनलाल | भाजप |
| १५ अ | भुषणसंजय चौधरी | शिवसेना |
| १५ अ | पंकजज्ञानेश साबळे | मनसे |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १५ ब**

| | | |
|---|---|---|
| १५ ब | नंदादीपक इंगळे | शिवसेना |
| १५ ब | दुर्गीयारेखा विजय | शिवसेना उबाठा |
| १५ ब | भंसालीमनीषा रवीन्द्र | भाजप |
| १५ ब | संगीता आनंद (पिंटू) वानखडे | राकाँ |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १५ क**

| | | |
|---|---|---|
| १५ क | शारदा रणजित खेडकर | भाजप |
| १५ क | कल्पना हनुमंतराव डाहे | शिवसेना उबाठा |
| १५ क | बाजड श्वेता लक्ष्मीकांत | शिवसेना |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १५ ड**

| | | |
|---|---|---|
| १५ ड | बाळ टाले | भाजप |
| १५ ड | मोंटु (लक्ष्मण) पंजाबी | शिवसेना उबाठा |
| १५ ड | प्रधानप्रशांत मधुकर | कॉंग्रेस |
| १५ ड | शर्मा समर्थ विजय | शिवसेना |
| १५ ड | अग्रवाल लक्ष्मीकांत कैलाश | लोजपा |
| १५ ड | विनोद राऊत | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १६ अ सिंधीकॅम्प**

| | | |
|---|---|---|
| १६ अ | सिध्दार्थ रामदास उपरवट | भाजप |
| १६ अ | रेणु रवि धंजे | शिवसेना |
| १६ अ | इरशाद हुसैन शाहिस्ता परवीन | राकाँ |
| १६ अ | अब्दुल रुकैय्यापरवीन अनिस | एमआयएम |
| १६ अ | मिलिंद दिलीप आकोडे | वंचित |
| १६ अ | प्रीती विशाल इंगळे | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १६ ब सिंधीकॅम्प**

| | | |
|---|---|---|
| १६ ब | मुस्कान आशिष पंजवानी | भाजप |
| १६ ब | मुलचंदानी वैजयंती राजकुमार | शिवसेना |
| १६ ब | अमरीन सदफ सैय्यद नाजीम | राकाँ |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १६ क सिंधीकॅम्प**

| | | |
|---|---|---|
| १६ क | नर्गिस परवीन फय्याज खान | राकाँ |
| १६ क | मिश्रा राजकुमारी राजकुमार | शिवसेना |
| १६ क | पुजा आशिष वाधवानी | वंचित |
| १६ क | आहुजा वंदना प्रेम | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १६ ड सिंधीकॅम्प**

| | | |
|---|---|---|
| १६ ड | बडोणे संजय बाबुलाल | भाजप |
| १६ ड | दर्शन लिलाराम राज | शिवसेना |
| १६ ड | रफिक सिद्दिकी | राकाँ |
| १६ ड | सुरेखा मधुकर इंगळे | वंचित |
| १६ ड | आशिष गौतम वाकोडे | प्रहार |


RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा


**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १७ अ हरिहरपेठ**

| | | |
|---|---|---|
| १७ अ | गेडाम जया विनोद | काँग्रेस |
| १७ अ | चव्हाण सविता गजानन | शिवसेना |
| १७ अ | शितल संतोष डाबेराव | राकाँ |
| १७ अ | पद्मा दशरथ झळके | एमआयएम |
| १७ अ | गुजर नेहा अमोल | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १७ ब हरिहरपेठ**

| | | |
|---|---|---|
| १७ब | अमरीन तबस्सुम सैय्यद खुर्रम | काँग्रेस |
| १७ब | किशोर श्रीराम अरुळकर | शिवसेना उबाठा |
| १७ब | अंकिता चेतन गुजर | शिवसेना |
| १७ब | मोहोकार अमोल अवधुत | भाजप |
| १७ब | अजीज सिकंदर शेख | एमआयएम |
| १७ब | देवा दशरथ गावंडे | वंचित |
| १७ब | गीते प्रमिला पुंडलिक | अपक्ष |
| १७ब | शेख मोहम्मद राजिक अब्दुल रउफ | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १७ क हरिहरपेठ**

| | | |
|---|---|---|
| १७क | वैशाली सुधीर काहकर | राकाँ |
| १७क | सुजाता राजु चव्हाण | शिवसेना उबाठा |
| १७क | गीता रमाशंकर मिश्रा | शिवसेना |
| १७क | रफिया बि याकुब खान | काँग्रेस |
| १७क | आयशा अंजुम गुलाम ख्वाजा | एमआयएम |
| १७क | सौ. सरस्वती किशोर पटेल | अपक्ष |
| १७क | सिमा ऋतिक महाजन | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १७ ड हरिहरपेठ**

| | | |
|---|---|---|
| १७ड | आझाद खान अलियार खान | काँग्रेस |
| १७ड | बाबासाहेब प्रभू घुमरे | राकाँ |
| १७ड | राजेश कृपाशंकर मिश्रा | शिवसेना |
| १७ड | सटाळे शारदा ज. मुरलीधर | शिवसेना उबाठा |
| १७ड | साहु करण अशोक | भाजप |
| १७ड | फैसल अहमद मुश्ताक अहमद | एमआयएम |
| १७ड | कदम गणेश श्रीराम | वंचित |
| १७ड | गोवर्धन कृष्णराव वाघाडे | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १८ अ वाशिमरोड**

| | | |
|---|---|---|
| १८ अ | कांबळे वंदना लक्ष्मण | शिवसेना उबाठा |
| १८ अ | कांबळे सरिता सुनिल | भाजप |
| १८ अ | कांबळे स्मिता गजानन | काँग्रेस |
| १८ अ | नवले सपना अश्विन | शिवसेना |
| १८ अ | रिता प्रभाकर नवघरे | एमआयएम |
| १८ अ | ॲड शितल सिमांत तायडे | वंचित |
| १८ अ | सुनीता संतोष हिवराळे | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १८ ब वाशिमरोड**

| | | |
|---|---|---|
| १८ ब | अब्दुल रउफ गुलाम नबी | काँग्रेस |
| १८ ब | अमोल सुधाकर गोगे | भाजप |
| १८ ब | अविनाश सत्येंद्रनाथ चव्हाण | राकाँ |
| १८ ब | दत्ता एकनाथ बावस्कर | शिवसेना उबाठा |
| १८ ब | बजरंग विकास रोडे | शिवसेना |
| १८ ब | रीजवाना परविन शेख अजीज | एमआयएम |
| १८ ब | कलोरे सुरेश नारायण | वंचित |
| १८ ब | दुधे संजय नारायण | अपक्ष |
| १८ ब | पंढरी नामदेवराव दोरकर | अपक्ष |
| १८ ब | अजय हरिभाऊ वाळसकर | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १८ क वाशिमरोड**

| | | |
|---|---|---|
| १८ क | अर्शिया परवीन मोहम्मंद शारिक | काँग्रेस |
| १८ क | देशमुख कविता दिलीप | राकाँ |
| १८ क | अर्चना प्रदीप मुदीराज | शिवसेना |
| १८ क | सुरेखा पुरुषोत्तम अहीर | वंचित |
| १८ क | शाइस्ता परवीन शेख अबरार | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १८ ड वाशिमरोड**

| | | |
|---|---|---|
| १८ ड | उमेश सुरेश इंगळे | राकाँ |
| १८ ड | आशिष सुशिल तिवारी | शिवसेना उबाठा |
| १८ ड | नवले अश्विन उध्दवराव | शिवसेना |
| १८ ड | फिरोज खान अलीयार खान | काँग्रेस |
| १८ ड | अविनाश अनिल मुरेकर | मनसे |
| १८ ड | मिश्रा दिलीप रामकृपाल | भाजप |
| १८ ड | हुसेन खाँ | बहुजन समाज पार्टी |
| १८ ड | मोहम्मद रिजवान | एमआयएम |
| १८ ड | सचिन मन्साराम सोनोने | अपक्ष |




**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १९ अ कौलखेड**

| | | |
|---|---|---|
| १९ अ | इंजि. अमोल उत्तमराव इंगळे | राकाँ |
| १९ अ | अजय माणिकराव इंगोले | शिवसेना |
| १९ अ | खंडारे प्रमोद अशोक | शिवसेना उबाठा |
| १९ अ | धबाले धनंजय गणपत | भाजप |
| १९ अ | राहूल श्रावण मस्के | वंचित |
| १९ अ | चांदणे सुनंदा सुधाकर | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १९ब कौलखेड**

| | | |
|---|---|---|
| १९ ब | संगिता वसंत आत्राम | शिवसेना |
| १९ ब | अजाबराव श्यामराव उईके | शिवसेना उबाठा |
| १९ ब | नंदकिशोर विठ्ठल ठाकरे | राकाँ |
| १९ ब | गजानन शालीग्राम सोनोने | भाजप |
| १९ ब | धनश्री रमेश सोने | वंचित |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १९ क कौलखेड**

| | | |
|---|---|---|
| १९ क | श्रध्दा प्रणव कोल्हे | राकाँ |
| १९ क | सारिका रामेश्वर पडुळकर | शिवसेना उबाठा |
| १९ क | योगिता गणेश पावसाळे | भाजप |
| १९ क | सोनाली सतपालसिंह राजपुत | शिवसेना |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १९ ड कौलखेड**

| | | |
|---|---|---|
| १९ ड | गावंडे पुजा पंकज | राकाँ |
| १९ ड | प्रतिमा अश्विन पांडेय | शिवसेना उबाठा |
| १९ ड | बडोणे माधुरी संजय | भाजप |
| १९ ड | नैना निखिल सुकेडे (ठाकुर) | शिवसेना |
| १९ ड | पवार रुख्मीनी मुरलीधर | वंचित |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. २० अ खडकी**

| | | |
|---|---|---|
| २० अ | विजय रामदास इंगळे | शिवसेना उबाठा |
| २० अ | यश रविंद्र घनबहादुर | शिवसेना |
| २० अ | नंदा विजय जाधव | मनसे |
| २० अ | मंगेश भगवान झिने | भाजप |
| २० अ | अविनाश विश्वनाथ मोरे | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. २० ब खडकी**

| | | |
|---|---|---|
| २० ब | सुरेखा मंगेश काळे | शिवसेना उबाठा |
| २० ब | शारदा वैकुंठ ढोरे | भाजप |
| २० ब | डॉ. मोहोड नेहा संगम | शिवसेना |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. २० क खडकी**

| | | |
|---|---|---|
| २० क | सोनाली गणेश अंधारे | भाजप |
| २० क | घोगरे वर्षा राजेश | शिवसेना उबाठा |
| २० क | वैष्णवी कुणाल शिंदे | शिवसेना |
| २० क | ज्योती सुनिल शिंगनाद | अपक्ष |

**अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. २० ड खडकी**

| | | |
|---|---|---|
| २० ड | गौरव शंकरलाल अग्रवाल (गोटु) | शिवसेना |
| २० ड | ऋषभ राजेश अत्तरकर | आम आदमी पार्टी |
| २० ड | बोचरे विजय रामदास | मनसे |
| २० ड | विनोद मुरलीधर मापारी | भाजप |
| २० ड | शंकर भाउराव लंगोटे | शिवसेना उबाठा |


अकोला महानगरपालिका - नागरिकांसोबत, विकासासाठी!
स्वच्छ अकोला, सुखी अकोला - हेच आपलं ध्येय



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK